cmyk

## संपादकीय

### प्रियंका शैली, काँग्रेसला सावरेल?

काही वर्षांपूर्वी एका एकपात्री कार्यक्रमात एका कलाकाराने बहुतेक राजकीय नेत्यांची खिल्ली उडवली होती. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वड्रा राजकारणात सक्रिय झाल्या असल्यामुळे त्यांचाही विषय आला. प्रियंका गांधी यांना काँग्रेसमध्ये प्रमुख भूमिका मिळाली पाहिजे अशी काँग्रेसमधील नेत्यांची मागणी आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-२३४ | सोमवार दि.२२ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


# विजपुरवठा अनियमित: शेतकऱ्यांचे रब्बी पिके धोक्यात!

पुणे । प्रतिनिधी

**रब्बी हंगाम ऐन भरात असताना राज्यात अनेक ठिकाणचे शेतकरी गंभीर संकटात सापडले आहेत. अनेक शेतकऱ्यांकडे विहिरी, बोअरवेल व नाल्यांद्वारे पाण्याची मुबलक सोय आहे; मात्र वीजपुरवठाच नियमित नसल्याने पाणी असूनही पिकांना वेळेवर ओलित देता येत नाही. आठवड्यातून केवळ तीन दिवस मिळणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे रब्बी पिके धोक्यात आली आहेत. गेल्या वर्षभरापासून शेतकरी कोणत्या ना कोणत्या संकटात सापडत आला असून, आता रब्बीकडून त्याला मोठ्या आशा आहेत मात्र विज पूरवठा वेळेवर होत नसल्याने पाणी असूनही ते पिकांना देता येत नसल्याचे दिसत आहे.**



यंदा अतिवृष्टीमुळे कापूस, सोयाबीन व तूर या खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्यानंतर नोव्हेंबरपर्यंत पावसाची हजेरी कायम राहिल्याने नुकसान आणखी वाढले. या तोट्याची भरपाई करण्याच्या उद्देशाने शेतकऱ्यांनी रब्बीत गहू, हरभरा, मूग व ज्वारीची पेरणी केली आहे. मात्र, पिके जोमात असतानाच विजेअभावी सिंचनाचा प्रश्न गंभीर झाला आहे. अतिवृष्टीमुळे जलस्रोत भरले असले, तरी वीज आठवड्यातून केवळ तीन ते चार दिवस उपलब्ध होत असल्याने सिंचनाचे नियोजन कोलमडले आहे. काही शेतकरी रात्रीच्या वेळी पाणी देत आहेत; मात्र त्या वेळी हिंस्र प्राण्यांचा धोका असल्याने जीव धोक्यात घालून शेती करावी लागत आहे. त्यामुळे नियमित वीजपुरवठ्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. यंदा पाऊस भरपूर झाल्याने रब्बीसाठी मोठ्या ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### काळा कायदा: विरोधात लढा देणार - सोनिया गांधी

दिल्ली : ग्रामीण रोजगार योजनेतील बदलांवरून काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर तीव्र हल्ला चढवला आणि त्यांनी सांगितले की त्यांनी पूर्वी गरिबांच्या हक्कांसाठी लढा दिला होता आणि ''काळा कायदा'' म्हणून वर्णन केलेल्याच्या विरोधात पुन्हा लढेन, असा इशारा काँग्रेस त्यांनी दिला. सोनिया गांधी पुढे बोलताना म्हणाल्या की, हा कायदा संसदेत सर्वसंमतीने मंजूर झाला होता आणि ते एक क्रांतिकारी पाऊल ठरले होते. ज्यामुळे कोट्यवधी ग्रामीण कुटुंबांना, विशेषतः वंचित, शोषित आणि समाजातील सर्वात गरीब घटकांना फायदा झाला. या योजनेने ग्रामीण कुटुंबांना उपजीविकेचा एक महत्त्वाचा स्रोत प्रदान केला, लोकांना त्यांच्याच गावात काम शोधण्याची परवानगी देऊन संकटग्रस्त स्थलांतर रोखले आणि नागरिकांना रोजगाराचा कायदेशीर अधिकार दिल्याचे त्यांनी सांगितले.

### रेल्वेकडून प्रवासी भाड्यात पुन्हा वाढ

नवी दिल्लीः एसी डब्यांमध्ये प्रवास करणाऱ्या आणि मेल व एक्सप्रेस गाड्यांमधील नॉन-एसी प्रवाशांना २६ डिसेंबरपासून थोडे अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. रेल्वे मंत्रालयाने या श्रेणींसाठी प्रति किलोमीटर २ पैशांनी भाडे वाढवले आहे. मात्र नॉन-एसी डब्यात ५०० किलोमीटर प्रवास करणाऱ्या प्रवाशाला १० रुपये अधिक मोजावे लागणार आहेत. सामान्य श्रेणीत २१५ किलोमीटरपेक्षा जास्त प्रवासासाठी भाडे प्रति किलोमीटर १ पैशाने वाढले आहे. मेल आणि एक्सप्रेस नॉन-एसी श्रेणींमध्ये भाडेवाढ प्रति किलोमीटर २ पैसे आहे, तर एसी श्रेणींमध्ये देखील प्रति किलोमीटर २ पैशांची माफक वाढ होणार आहे. यंदाच्या आर्थिक वर्षातील रेल्वेने केलेली दुसरी भाडेवाढ आहे. यापूर्वीची जुलै महिन्यात भाडेवाढ लागू करण्यात आली होती.

### पैसे भरण्यास विलंब म्हणजे जमीन व्यवहार रद्द नव्हे

नवी दिल्लीः जमीन खरेदी व्यवहारात मुदतीपेक्षा पैसे भरण्यास थोडा उशीर झाला, तरी तो व्यवहार किंवा कोर्टाचा आदेश रद्द ठरवता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला आहे. मात्र, खरेदीदार करारातील आपली जबाबदारी पूर्ण करण्यास सतत तयार असल्याचे दिसून येणे आवश्यक आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती संजय करोल यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या मुदतीत रक्कम न भरणे म्हणजे कराराचा त्याग करणे किंवा तो रद्द करणे असा होत नाही. अशा प्रकारात खरेदीदाराचे वर्तन कराराची पूर्तता करण्यास स्पष्ट नकार दर्शवणारे आहे का? हे पाहणे महत्त्वाचे ठरते. या प्रकरणात खरेदीदाराने अंमलबजावणीसाठी अर्ज दाखल करणे आणि रक्कम करण्यास इच्छुक असल्याचे सिद्ध झाले आहे.

### लेफ्टनंट कर्नलच्या घरातून २.३६ कोटींची रोकड जप्त

नवी दिल्लीः बेंगळुरू येथील एका खासगी कंपनीकडून ३ लाख रुपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने लेफ्टनंट कर्नल दीपक कुमार शर्मा याला अटक केली. तो संरक्षण मंत्रालयांतर्गत येणाऱ्या संरक्षण उत्पादन विभागात कार्यरत होता. धक्कादायक बाब म्हणजे त्यांच्या घरावर टाकलेल्या छाप्यात सीबीआयने तब्बल २.३६ कोटी रुपयांची रोकड जप्त केली आहे. गुन्हेगारी कट आणि भ्रष्टाचाराचा आरोप मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सीबीआयने १९ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल केला होता. यामध्ये लेफ्टनंट कर्नल दीपक कुमार शर्मा (उप नियोजन अधिकारी, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि निर्यात), कर्नल काजल बाली (कमांडिंग ऑफिसर, १६ इन्फंट्री डिव्हिजन ऑर्डनन्स युनिट, श्रीगंगानगर, राजस्थान) आणि दुबईस्थित एका कंपनीसह अन्य काही जणांचा समावेश आहे.

# नगरपरिषदांच्या निवडणुकीत महायुती सुसाट!

## भाजपने जिंकल्या सर्वाधीक जागा तर आघाडीची पिछेहाट

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींचा निकाल रविवारी जाहीर झाला आहे. या निकालात सत्ताधारी महायुतीमधील प्रमुख पक्षांनी मोठे यश मिळवले आहे. भाजपचे सर्वाधिक नगराध्यक्ष निवडून आले असून, त्या पाठोपाठ शिंदे शिवसेना, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस यांनी विजय मिळविला आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडीची या निकालात पिछेहाट झाल्याचे दिसून येत आहे.**

महाराष्ट्रात सध्या भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह भाजपच्या नेत्यांनी नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत आक्रमकपणे प्रचार केला होता. नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत भाजप पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. भाजपचे १२० नगराध्यक्ष निवडून आले आहेत. भाजपची ही राज्यातील आतापर्यंतच्या नगरपालिका निवडणुकीतील सर्वोत्तम कामगिरी आहे. भाजपने पश्चिम महाराष्ट्र, कोकण, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात चांगली कामगिरी केली आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने देखील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत चांगली कामगिरी केली आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने राज्यातील ५४ नगरपरिषद, नगरपंचायतीमध्ये नगराध्यक्ष निवडून आणले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रचाराची धुरा सांभाळली ▶▶ पान २ वर



### वंचितचे दोन नगरपालिकेवर वर्चस्व

वंचित बहुजन आघाडीला देखील या निवडणुकीत यश मिळाले आहे. वंचित बहुजन आघाडीने अकोल्यातील बार्शी टाकळी आणि अमरावतीमधील चांदूर रेल्वे नगरपरिषेदत नगराध्यक्ष निवडून आणले आहेत. स्थानिक आघाड्यांचे २३ ठिकाणी नगराध्यक्ष निवडून आले आहेत.

### » भाजपच महाराष्ट्रातील नंबर वन पक्ष-देवेंद्र फडणवीस



नगर परिषद निवडणुकीतील महायुतीच्या घवघवीत यशानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या आरोपांना चोख प्रत्युत्तर दिले. २०१४ पासून भाजपचा वरचष्मा कायम असून, ग्रामीण भागातही पक्षाची पकड मजबूत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. फडणवीस म्हणाले की, २०१४ नंतरच्या प्रत्येक निवडणुकीत भाजपने शहरांपासून गावांपर्यंत विजय मिळवला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत जागा कमी झाल्या असल्या, तरी भाजपची मते कमी झालेली नाहीत. ग्रामीण भागातही मतदारांनी भाजपला मोठी पसंती दिली असून, भाजप हा सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन चालणारा महाराष्ट्रातील पहिल्या क्रमांकाचा पक्ष असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

### » 'ईव्हीएम' आणि 'पैशांचा पाऊस' - संजय राऊत



नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या यशावर राऊत यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, ''विधानसभेचे जे आकडे होते, तेच आकडे आताही दिसत आहेत. याचा अर्थ मशीन अजूनही त्याच पद्धतीने सेट आहे. भाजपने सेटिंगमध्ये कोणताही बदल केलेला नाही, किमान आकडे तरी बदलायला हवे होते. निवडणुकीतील खर्चावर टीका करताना राऊत म्हणाले की, ही निवडणूक लोकशाहीची नसून पैशांच्या ताकदीची होती. ३० कोटींचे बजेट असलेल्या नगरपालिकेसाठी सत्ताधाऱ्यांनी १५० कोटी रुपये खर्च केले. नगरपालिकेच्या प्रचारासाठी चार्टर फ्लाईट्स आणि हेलिकॉप्टरचा वापर झाला. ही स्पर्धा विरोधकांशी नसून सत्ताधारी पक्षांमध्येच (शिंदे गट, भाजप आणि अजित पवार गट) एकमेकांविरुद्ध होती. असा टोला त्यांनी लगावला.

### » टायगर अभी जिंदा हैं - वडेट्टीवार



राज्यातील नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीत भाजपला मोठे यश मिळाले. भाजपने बहुतांश ठिकाणी सत्ता मिळवली. पण चंद्रपूर जिल्ह्यात काँग्रेसने भाजपला रोखले. चंद्रपूरमध्ये ११ पैकी ८ ठिकाणी काँग्रेसचे नगराध्यक्ष निवडून आले आहेत. भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला प्रत्येकी एक जागा मिळाली. तर एका जागेवर अपक्ष निवडून आला. यावर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया दिली. चंद्रपूर में टायगर अभी जिंदा हैं असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी या विजयानंतर गाण्यावर ठेका धरला. वडेट्टीवार म्हणाले, चंद्रपूर हा पुरोगामी विचारांवर विश्वास ठेवणारा, काँग्रेसच्या विचारांचा जिल्हा आहे. यामुळे प्रचंड यश मिळाले. ११ पैकी भाजपला फक्त १ जागा मिळाली. महाराष्ट्रात प्रचंड सत्ता असताना चंद्रपूरचा गड आम्ही राखला. इसका मतलब है. चंद्रपूर जंगल जिल्हा, चंद्रपूर में टायगर अभी जिंदा आहे.

## अंबडच्या नगराध्यक्षपदी भाजपाच्या देवयानी कुलकर्णी



अंबड । प्रतिनिधी


अंबड नगरपालिका २ ऑक्टोंबर रोजी मतदान झाले होते त्याचा निकाल आज २१ ऑक्टोंबर रोजी घोषित झाला. या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष देवयानी कुलकर्णी१३४२३ मतं घेऊन विजय झाली तर शरदचंद्र पवार गटाचे श्रद्धा चांगले यांना ७५१६ मत पडले, एकनाथ शिंदे गटाचे सना पटेल यांना ९८८ मतदान पडले, दर्शना खरात यांना २०५ मत पडले . भाजपचे १४ नगरसेवक निवडून आले तर रसप चे दोन ▶▶ पान २ वर

## वाघ, बिबट्यांच्या हल्ल्यात १० महिन्यांत ४७ बळी

मुंबई । प्रतिनिधी

मानवी वसाहतींमध्ये वाघ आणि बिबट्यांचा वावर वाढू लागल्यामुळे या दोन प्राण्यांनी केलेल्या हल्ल्यात मागील दहा महिन्यांत ४७ जणांचा बळी गेला आहे, तर वनविभागाच्या डायरीत पाच वर्षांत ३७७ लोकांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे.

या डायरीनुसार, गेल्या पाच वर्षांत वाघांच्या हल्ल्यात २५०, तर बिबट्यांच्या हल्ल्यात ८७ जणांचा मृत्यू झाला आहे. रानडुक्कर, कोल्हे, तरस, रानगवा इत्यादी वन्यप्राण्यांच्या हल्ल्यातही अनेक जण जखमी झाले आहेत. वाघ, बिबट्या, रानडुक्कर, कोल्हे, तरस, अस्वल, लांडगा, माकड आणि खोकड यांचा वावर आता शहरी भागातही वाढला आहे. त्यामुळे मनुष्य आणि पशुधनावरील हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. झपाट्याने होणारी जंगलतोड आणि प्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासावर



झालेल्या मानवी घुसखोरीमुळे हा संघर्ष तीव्र झाला आहे.जंगलांची बेसुमार कत्तल झाल्याने अन्न व आश्रयासाठी वन्यप्राणी मानवी वसाहतीकडे येत आहेत. त्यामुळे मानव आणि वन्यप्राणी संघर्ष अटळ झाला आहे. वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास पीडितांच्या कुटुंबीयांना २५ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. परंतु मृत्यू आणि हल्ले पाहता मदत हा उपाय नसून ठोस प्रतिबंधात्मक ▶▶ पान २ वर

## ज्येष्ठ पत्रकार नागनाथ आप्पा यांचे निधन

अंबाजोगाई । प्रतिनिधी



येथील जुन्या पिढीतील नागरिकांनी जेष्ठ पत्रकार नागनाथ आप्पा वारद यांचे आज रविवारी सायंकाळी दुःखद निधन झाले मृत्यू समय त्यांचे वय ७० वर्ष होते

अंबाजोगाई शहरामध्ये सर्वपरिचित असलेले जेष्ठ पत्रकार म्हणून नागनाथ आप्पा वरद यांची ▶▶ पान २ वर

# आ.मुंडे -मुंदडा वगळता सोळुंके, पंडित, क्षीरसागर यांना मतदारांनी नाकारले

बीड । प्रतिनिधी

**नुकत्याच बीड जिल्ह्यातील परळी, अंबाजोगाई, धारूर, माजलगाव, गेवराई, आणि बीड या सहा नगरपालिकेच्या निकालात माजी मंत्री धनंजय मुंडे आणि केजच्या आमदार नमिता मुंदडा यांनी आपले मतदारसंघ शाबूत ठेवले. मात्र आ.प्रकाश सोळुंके, आ.विजयसिंह पंडित आणि आ. संदीप क्षीरसागर यांना मात्र सत्ता काबीज करता आली नाही. त्यांना शहरातील नागरिकांनी डावल्याचे चित्र आज रविवारच्या नगरपरिषदांच्या निकालातून दिसून आले.**







बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिकेच्या निवडणुका स्थानिक लोकप्रतिनिधीने प्रतिष्ठेच्या केल्या होत्या. परळी वगळता इतर पाच नगरपालिकेमध्ये महायुती नव्हती किंवा महाविकास आघाडीही नव्हती. परळीमध्ये अपेक्षेप्रमाणे आमदार धनंजय मुंडे, मंत्री पंकजा मुंडे यांनी सोबत येत महायुतीचा झेंडा पुन्हा पालिकेवर फडकवला. या ठिकाणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे सुरुवातीपासून शेवटपर्यंत परळीत ठाण मांडून होते. मात्र त्यांच्या प्रयत्नाला यश आले नाही. शेवटी धनंजय मुंडे, पंकजा मुंडे यांचा करिष्मा चालला आणि जनतेने त्यांनाच स्वीकारले. तर शेजारी असलेल्या अंबाजोगाई नगरपालिकेसाठी पक्ष नसला तरी पुरस्कृत आघाड्या होत्या. गेल्या ▶▶ पान २ वर

## टिईटी परीक्षेची अंतरिम उत्तरसूची जाहीर

पुणे । प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेतलेल्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ पेपर क्रमांक एक आणि पेपर क्रमांक दोनची अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे.**

राज्य परीक्षा परिषदेतर्फे संबंधित परीक्षा घेण्यात आली. परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका क्रमांक एक आणि प्रश्नपत्रिका क्रमांक दोन याबाबत कोणत्याही प्रश्नाबाबत किंवा पर्यायी उत्तराबाबत त्रुटी किंवा आक्षेप असल्यास परिषदेकडे २७ डिसेंबरपर्यंत आक्षेप नोंदविता येणार आहेत. प्रश्नपत्रिका आणि त्यातील प्रश्नांबाबत काही आक्षेप किंवा त्रुटींबाबतचे निवेदन पुराव्यासह संकेतस्थळावर परीक्षार्थ्यांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध आक्षेप नोंदणी या लिंकद्वारे परिषदेकडे पाठवण्याचे आवाहन करण्याहत आले आहे. आक्षेपाबाबत लेखी निवेदन टपालाद्वारे, ई-मेलद्वारे पाठविल्यास त्याचा विचार होणार नाही. राज्य परीक्षा परिषदेने दिलेल्या मुदतीत ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २२.०० क्विंटल | २,३५० | २,९४१ | २,६८२ |
| ज्वारी/हायब्रिड : ३२.५० क्विंटल | २,३१० | ३,८११ | २,८९८ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,३५० | ६,३५० | ६,३५० |
| उडीद :२.०० क्विंटल | ४,८०० | ४,८०० | ४,८०० |
| बाजरी: ३९.५० क्विंटल | २,७१९ | ३,६८० | ३,०८८ |
| मुग: १.०० क्विंटल | ६,१५० | ६,१५० | ६,१५० |
| सोयाबीन: १३२.५० क्विंटल | ४,४५० | ४,५११ | ४,४९० |
| हरभरा: १.०० क्विंटल | ४,१०० | ६,००१ | ५,०५० |

cmyk

## अग्रलेख

# प्रियंका शैली, काँग्रेसला सावरेल ?

काही वर्षांपूर्वी एका एकपात्री कार्यक्रमात एका कलाकाराने बहुतेक राजकीय नेत्यांची खिल्ली उडवली होती. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वड्रा राजकारणात सक्रिय झाल्या असल्यामुळे त्यांचाही विषय आला. प्रियंका गांधी यांना काँग्रेसमध्ये प्रमुख भूमिका मिळाली पाहिजे अशी काँग्रेसमधील नेत्यांची मागणी आहे. त्याचे कारण काय तर त्या त्यांच्या आजी इंदिरा गांधी यांच्यासारख्या दिसतात. तसे तर मग जयराम रमेशही दिसतात असे म्हणत आणि आणखी एक दोघांची नावे घेत तेही इंदिरा गांधी यांच्यासारखे दिसतात असे नमूद करत संबंधित कलाकाराने विनोद केला. त्याने टाळ्या आणि हशे वसुल केले. त्याला बरेच दिवस झाले.

आता पुन्हा एकदा तोच विषय म्हणजे प्रियंकांचा विषय चर्चेला आहे. विशेष म्हणजे काँग्रेस कार्यकर्त्यांची नेहमीप्रमाणेच त्यांना मागणी आणि त्यांच्याकडून अपेक्षा आहेतच, तथापि, देशातील राजकीय घडामोडींकडे बारकाईने लक्ष ठेवणाऱ्या वर्गालाही मनोमनी प्रियंका यांची काँग्रेसमधील भूमिका अधिक व्यापक असावी असे वाटते. त्यांचे नाक आणि केशभूषा आजीसारखी आहे म्हणून नाही तर बर्याच काळांनी संसदेत काँग्रेसकडून भाषण करणारा कोणी नेता जर नॅचरल आणि प्रभावी वाटला असेल तर त्या प्रियंका गांधी आहेत, म्हणून त्यांच्या व्यापक भूमिकेची अपेक्षा केली जाते आहे. सोनिया गांधी यांनी प्रदीर्घ काळ काँग्रेसचे अध्यक्षपद भूषवले. त्यांनी कमान हाती घेतली तेव्हाही काँग्रेसवर भ्रष्टाचाराचे आरोप होते. त्यातच पक्षाचे केंद्रातले सरकार गेले आणि आघाड्यांच्या राजकारणाचे युग सुरू झाले. सोनियांनी व्यापक आघाडी स्थापन करत काँग्रेसला पुन्हा सत्तेवर आणले. दरम्यानच्या काळात प्रकृती अस्वास्थ्य आणि पुढच्या पिढीकडे धुरा सोपवण्याची प्रक्रियाही त्यांनी संयमीपणे सुरू केली आणि आपल्या खासदार पुत्राकडे हळूहळू जबाबदाऱ्यांचे हस्तांतरण करण्यात सुरुवात केली. हे करताना काँग्रेसमध्ये एकाच वेळी तीन सत्ताकेंद्रे निर्माण होणार नाहीत याची दक्षता त्यांनी घेतली. राहुल गांधी यांच्याकडे जबाबदारी सोपवल्यानंतर त्यांचा सल्लेवजा किंवा त्यापेक्षाही अधिक हस्तक्षेप राहिला असूही शकतो, मात्र पक्षात गोंधळाचेच वातावरण निर्माण होईल एवढ्या त्या केंद्रस्थानी राहिल्या नाहीत. त्याचवेळी त्यांनी ही पण दक्षता घेतली की प्रियंका गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे केवळ काँग्रेसजनांनाच नाही तर देशातील सामान्य जनतेलाही जे आकर्षण आहे त्यामुळे राहुल यांना अडचण होऊ नये यासाठी प्रियंका यांना बॅकसीटवरच ठेवले. आपल्या आईचा आणि भावाचा मतदार संघ हाताळणे एवढ्यापुरतेच प्रियंका यांनीही स्वत:ला मर्यादित ठेवले. किंबहुना तशी ठरवून व्यवस्था केली गेली होती. सततच्या पराभवांमुळे अखेर त्यांना सरचिटणीस पदाची जबाबदारी दिली गेली. उत्तर प्रदेशपासून संसदीय राजकारणाचा श्रीगणेशा करण्याची गांधी कुटुंबाची परंपरा आहे. त्यानुसार प्रियंका यांच्याकडे उत्तर प्रदेश दिले गेले. त्यांनीही 'लडकी हुं, लढ सकती हूं' हे नवे लक्षवेधी अभियान सुरू केले. मात्र गेल्या दहा वर्षांतील देशाच्या राजकारणात नरेंद्र मोदी यांचा प्रभाव एवढा सर्वत्र आहे की अनेक मोठे, उदयोन्मुख आणि उज्वल भविष्य असलेले नेते त्यात झाकोळले गेले. केवळ राहुल आणि प्रियंकाच नाही, अनेक नेत्यांची किंबहुना प्रत्येक राज्यातील अशा अनेक नेत्यांची नावे घेता येतील. तो विषय वेगळा, मुद्दा असा की प्रियंकांना उत्तर प्रदेशने तेव्हा स्वीकारले नाही. त्यामुळेच नंतर जेव्हा त्यांना संसदेवर पाठवण्याचा निर्णय झाला तेव्हा राहुल यांनी सोडलेली वायनाडची जागा त्यांच्याकरता निश्चित केली गेली. राहुल यांनी रायबरेली सोडली असती व प्रियंकांनी तेथून सुरुवात केली असती तर कदाचित काँग्रेससाठी आज चित्र अधिक सकारात्मक राहिले असते. संसदेच्या आज समाप्त झालेल्या अधिवेशनात वंदे मातरमवर चर्चा झाली. या चर्चेत अनेकांनी भाषणे केली. यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि प्रियंका गांधी यांची भाषणे लक्षवेधी ठरली. मोदींनी काँग्रेसवर हल्ला चढवला. विरोधी पक्षनेते म्हणून राहुल यांच्याकडून त्याला उत्तर येणे अपेक्षित होते. मात्र ती जबाबदारी प्रियंका यांनी पार पाडली. केवळ पार पाडली नाही तर सक्षमपणे पार पाडली. नवी तथ्य आणि तर्क मांडत अवास्तव आक्रमक न होताही सरकारला पिंजऱ्यात उभे करता येऊ शकते हे त्यांनी दाखवले. त्यांचा प्रभाव विरोधी पक्षांवर आणि जनमनसावर पडला आणि काँग्रेसही त्याला अपवाद राहू शकत नाही. त्यामुळेच पुन्हा राहुल–प्रियंका तुलना आणि भविष्यातील शक्यतांच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. एका नेत्याने प्रियंकांना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष करावे अशी मागणी केली. चर्चा वाढत जाऊ नये म्हणून वेळीच खबरदारी घेत त्या नेत्याची पक्षातून हकालपट्टी झाली आहे. तरीही तुलना होणार आणि पक्षाच्या भवितव्यासाठी ते होणे अपरिहार्य आहे. त्यातून आता काँग्रेसला व विशेषत: सोनिया गांधींना मार्ग काढावा लागेल. राहुल यांच्याकडे पक्षाची जबाबदारी आली तेव्हा त्यांचीही द्विधा स्थिती होती. सोनिया गांधींची काँग्रेस जैसे थे ठेवायची की आपल्याला हवी तशी काँग्रेस तयार करायची. त्यावर त्यांना अद्याप निर्णय घेता आलेला नाही व याचाच परिणाम पक्षाने ज्या वेगाने निर्णय घेणे अपेक्षित होते ते घेतले गेले नाहीत. त्याची परिणती नेत्यांची गळती आणि पक्षसंघटना दुबळी होण्यात झाली. प्रियंका यांची सहज संवाद शैली, मुद्देसूद मांडणी, लोकांना आणि कार्यकर्त्यांना असलेले त्यांचे आकर्षण आणि त्यांची एक नेता म्हणून असलेली कोरी पाटी या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. त्याचा योग्य वेळीच उपयोग झाला, तर काँग्रेसला लाभ होऊ शकतो.

# सुरक्षित राहण्यासाठी एकजूट राहावे लागेल–मोहन भागवत



**कोलकाता। । वृतसंस्था**

**बांगलादेशात हिंदू अल्पसंख्याक आहेत आणि तेथील परिस्थिती खूप कठीण आहे. म्हणून तेथील हिंदूंनी स्वत:च्या सुरक्षिततेसाठी एकजूट राहिले पाहिजे, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) प्रमुख मोहन भागवत यांनी केले. ते पश्चिम बंगालमधील सायन्स सिटी सभागृहात आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी त्यांनी जगभरात विशेषत: बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचारांबद्दल चिंता व्यक्त केली.**

मोहन भागवत म्हणाले की, केवळ बांगलादेशातीलच नाही तर जगभरातील हिंदूंनी त्यांना मदत करावी. आपण आपल्या सीमेत शक्य तितकी मदत करावी आणि आम्ही ते करत आहोत. भारत हा हिंदूंसाठी एकमेव देश आहे, म्हणून भारत सरकारने या मुद्द्यावर लक्ष दिले पाहिजे. तुम्ही आरएसएसला फक्त एक सेवा संस्था मानत असाल तर तुम्ही चुकीचे ठराल. बरेच लोक भाजपच्या दृष्टिकोनातून आरएसएसला समजून घेण्याचा कल ठेवतात, जी एक गंभीर चूक आहे. आरएसएसच्या स्थापनेचे सार एका वाक्यात आहे: ''भारत माता की जय.'' भारत हा केवळ एक देश नाही, तर त्याच्या अद्वितीय संस्कृती, परंपरा आणि निसर्गाचे नाव आहे. आरएसएसचे ध्येय हे आहे की, समाजाला या मूल्यांचे समर्थन करून भारताला पुन्हा जगाचे नेतृत्त्व बनवण्यासाठी तयार करणे असल्याचेही भागवत यांनी यावेळी सांगितले.

# भोकरदन पालिकावर शरदचंद्र पवार गटाच्या अध्यक्ष विजयी

**जालना । प्रतिनिधी**

**संपूर्ण जालना जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या भोकरदन नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल आज रविवारी जाहीर झाला असून, अत्यंत लढतीमध्ये चुरशीच्या लढतीमध्ये शरद पवार गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मिर्झा समरीन नाज वसीम या निवडून आल्या आहेत,**

दरम्यान अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या लढतीत तुतारीने काँग्रेसच्या वर्चस्वाला धक्का देत नगरपरिषदेवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. या विजयामुळे नगराध्यक्षपदाच्या खुर्चीवर आता मिर्झा समरीन नाज वसीम विराजमान झाल्या आहेत. या निवडणुकीत सुरुवातीपासूनच मोठी चुरस पाहायला मिळाली. मतमोजणीअंती समोर आलेल्या आकड्यांनुसार कोणत्याही एका पक्षाला निर्विवाद बहुमत मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला. या नगर परिषद निवडणुकीत तुतारीला (राष्ट्रवादी श.प. पक्ष) ९ जागा आणि भारतीय जनता पक्षाला ९ जागा मिळाल्या असून काँग्रेस पक्षाला केवळ २ जागा मिळवता आल्या आहे. नगरसेवक पदाच्या शर्यतीत भाजप आणि तुतारी यांच्यात ९–९ अशी बरोबरी झाली असली, तरी



सर्वात महत्त्वाची असलेली नगराध्यक्षपदाची जागा तुतारीच्या उमेदवाराने जिंकली आहे. मिर्झा समरीन नाज वसीम यांनी विजय मिळवत भोकरदन पालिकेवर तुतारीचा झेंडा फडकवला आहे. गेल्या काही काळापासून भोकरदनच्या राजकारणात काँग्रेसचे वर्चस्व राहिले आहे, मात्र या निकालाने राजकीय समीकरणे बदलली आहेत. काँग्रेसच्या केवळ २ जागा निवडून आल्या आलेल्या असून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला नगराध्यक्षपद आपल्याकडे खेचून आणण्यात यश आले आहे. या विजयानंतर शहरात कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करत आणि तुतारी वाजवत जल्लोष साजरा केला.भोकरदन नगरपरिषदेचा किल्ला 'तुतारी'च्या ताब्यात ! या निवडणुकीत सुरुवातीपासूनच मोठी चुरस पाहायला मिळाली. मतमोजणीअंती समोर आलेल्या आकड्यांनुसार कोणत्याही एका पक्षाला निर्विवाद बहुमत मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला. या नगर परिषद निवडणुकीत तुतारीला (राष्ट्रवादी श.प. पक्ष) ९ जागा आणि भारतीय जनता पक्षाला ९ जागा मिळाल्या असून काँग्रेस पक्षाला केवळ २ जागा मिळवता आल्या आहे. **नगराध्यक्ष पदासाठी झालेले मते** : मिर्झा समरीन नाज वसीम बेग ६०८२ ( तुतारी श .प. गट ), आशाबाई एकनाथ माळी ५३३९ (भाजपा ), देशमुख प्रियंका प्रतिक ३९६४ (काँग्रेस पक्ष ), कुरेशी सानिया कौसर शेख ३९४ (अजित पवार गट) प्रभागनिहाय विजयी उमेदवार प्रभाग : शर्मा भुषण बाबूप्रशाद (धनुष्यबाण शिंदे गट), रेखा द्वारकाधीश बिरसाने ( भाजपा ), पठाण अस्मतबेगम बशीरखा ( तुतारी श .प.), शाह अजहरअली इनूसअली ( तुतारी श .प.) देशमुख सुरेखाबाई बाळू ( तुतारी श .प.), पठाण आमेर शफिक ( तुतारी श .प. गट ), पठाण बिस्मिल्लाहवी सलीमखाँ (काँग्रेस पक्ष ), पठाण शफीक खॉ महेताब खॉ ( तुतारी श .प. गट ), जाधव गयाबाई रमेश (काँग्रेस पक्ष), जाधव रणवीरसिंह लक्ष्मणराव ( भाजपा ), देशपांडे निलीमा प्रवीण ( भाजपा ), थारेवाल सुमित जयेश ( भाजपा ), पाथरे चंचलाबाई रामदास ( भाजपा ), मोरे विपक नारायण ( भाजपा ) , वेग कुरेशानी शमिम ( तुतारी श .प. गट ), पगारे चंद्रकांत किसन ( तुतारी श .प. गट ), भारती शिला अभिजीत ( तुतारी श .प. गट ) कबीर शब्बीर अब्दुल. ( तुतारी श .प. गट ), लता शंकरराव सपकाळ ( भाजपा ) सहाने राजाराम रामकिसन (भाजपा ) मिर्झा समरीन नाज वसीम बेग नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर शरद पवार गटाच्या समर्थकांनी शहरात फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष साजरा केला.

# जामखेड नगरपरिषद निवडणूक निकालात सभापती प्रा.राम शिंदेचे निर्विवाद वर्चस्व

## पंधरा नगरसेवक व नगराध्यक्ष पदावर विजय संपादन करत भाजपाची एकहाती सत्ता

**जामखेड । प्रतिनिधी**

**नगरपरिषद निवडणूकीत सभापती प्रा राम शिंदे व आमदार रोहित पवार यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली होती. यात भाजपाने गड राखला आहे. नगराध्यक्ष पदासाठी भाजपाच्या उमेदवार प्रांजल अमित चिंतामणी ३६८२मतांनी विजय संपादन केला आहे. तर पंधरा नगरसेवक निवडून आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष पाच जागेवर विजयी तर वंचित बहुजन आघाडी दोन जागा शिवसेना एकनाथ शिंदे पक्ष एक जागा व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष एक अशा प्रकारे विजयी उमेदवार आहेत.**

विजयी उमेदवार पुढील प्रमाणे



आहेत नगराध्यक्ष पदासाठी भाजपाच्या उमेदवार प्रांजल अमित चिंतामणी साडेतीन हजार मतांपेक्षा जास्त मतांनी विजयी झाल्या आहेत. तर नगरसेवक पदासाठी पुढील उमेदवार विजयी आहेत.

प्रभाग एक–अ) सुमन शेळके ( भाजपा) ब) श्रीराम डोके (भाजपा) प्रभाग दोन– अ) अँड प्रविण सानप (भाजपा) ब) प्रिती प्रशांत राळेभात ( राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष) प्रभाग तीन अ) पोपट राळेभात (भाजपा) ब) सिमा रवींद्र कुलकर्णी (भाजपा) चार– अ) विकी घायतडक (भाजपा) ब) प्रांजल अमित चिंतामणी (भाजपा) प्रभाग पाच अ) हर्षद काळे (भाजपा) ब) वर्षा कैलास माने (शिवसेना एकनाथ शिंदे पक्ष) प्रभाग सहा– अ) डॉ. अँड.अरूण जाधव (वंचित बहुजन आघाडी) ब) संगिता भालेराव (वंचित बहुजन आघाडी) प्रभाग सात अ) नंदा प्रविण होळकर (भाजपा) ब) मोहन पवार (भाजपा) प्रभाग आठ– अ) हिना सय्यद राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ब) राजू गोरे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष प्रभाग नऊ अ) वैशाली अर्जुन म्हेत्रे (भाजपा) ब) तात्याराम पोकळे (भाजपा) प्रभाग दहा अ) मेहरुन्निसा कुरेशी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ब) वशिम सय्यद राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष प्रभाग आकरा अ) संजय काशिद (भाजपा) ब) आशाबाई टकले (भाजपा) प्रभाग बारा अ) महेश निमोणकर (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष) ब) जया संतोष गव्हाळे (भाजपा) वंचित बहुजन आघाडीने आपले खाते उघडत दोन जागी विजय संपादन केला आहे. प्रभाग सहा– अ) डॉ. अँड.अरूण जाधव (वंचित बहुजन आघाडी) ब) संगिता भालेराव (वंचित बहुजन आघाडी) विजय संपादन केला आहे. जामखेड नगरपरिषेदेत निवडणूकीत वंचित बहुजन आघाडीने खाते उघडत दोन उमेदवार झाले विजयी

# ठाकरेंचा विजयी उमेदवार शिंदेसेनेत प्रवेश करणार ?

**रायगड । प्रतिनिधी**

**श्रीवर्धन नगरपालिकेत ठाकरेसेनेचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार अतुल चौगुले विजयी झाले आहेत. मात्र, विजयी झाल्यानंतर काही वेळातच ते शिंदेसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला सुरूवात झाली आहे. अतुल चौगुले विजयी झाल्यानंतर शिंदेसेनेचे आमदार भरत गोगावले यांनी श्रीवर्धनला पोहोचत अतुल चौगुले यांचे अभिनंदन केले आहे. त्यानंतर दोन्ही शिवसेनेचे कार्यकर्ते एकत्रित जल्लोष करताना पहायला मिळाले.**

अतुल चौगुले यांनी विजयी झाल्यानंतर गोगावले यांचे जाहीरपणे आभार मानले आहेत. माझ्या विजयात भरत गोगावले यांचा मोठा वाटा आहे. त्यांनी मला सहकार्य केले. हे शिवसेना ठाकरे पक्ष आणि शिंदे पक्षाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांचे यश आहे. श्रीवर्धनमधील लढाई ही धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी होती. या निवडणुकीत कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले होते. पण श्रीवर्धनच्या जनतेने हे नाकारले. दोन्ही शिवसेना, काँग्रेस, शरद पवार पक्ष, शेकाप आणि अजित पवार गटातील असंतुष्टांनी मला मदत केली आहे, असे चौगुले यांनी म्हटले आहे. याबाबत भरत गोगावलेंनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, अतुल चौगुले हे शिवसेनेत प्रवेश करणार नाहीत. पण त्यांची मानसिकता शिवसेनेसोबत काम करण्याची आहे. शिवसेनेने त्यांना श्रीवर्धनमध्ये ताकदीने मदत केली आहे. ती मदत ते आयुष्यभर विसरणार नाहीत. आम्ही गनिमी काव्याने युद्ध केले. त्या युद्धात आमचा जय झाला, असे गोगावले यांनी म्हटले आहे.

## पान १ वरून...

### विजपुरवठा अनियमित: शेतकऱ्यांच

प्रमाणात पाण्याचा साठा उपलब्ध आहे. त्याचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांनी नियोजन केले आहे मात्र पाहिजे त्या प्रमाणात आणि योग्य वेळेत वीज मिळत नसल्याने अनेक ठिकाराणचे शेतकरी अडचणीत आले आहेत.

-----------------

### नगरपरिषदांच्या निवडणुकीत महायुती सुसाट !

होती. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने ४० नगरपरिषद आणि नगरपंचायतीत नगराध्यक्ष निवडून आणले आहेत. अजित पवारांनी पुणे जिल्ह्याच्या होम ग्राऊंड पुन्हा चांगली कामगिरी केली आहे. पुणे जिल्ह्यातील १७ नगरपरिषद आणि नगरपंचायतींपैकी १० ठिकाणी नगराध्यक्ष निवडून आणले आहेत. एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या सातारा जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे महाबळेश्वर आणि पाचगणीत नगराध्यक्ष विजयी झाले आहेत. कोल्हापूर, बीड जिल्ह्यात देखील राष्ट्रवादी काँग्रेसला यश मिळाले आहे. महाविकास आघाडीत काँग्रेस पक्षाने सर्वात चांगली कामगिरी केली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्त्वात काँग्रेसने ३४ नगरपरिषद आणि नगरपंचायतीत नगराध्यक्ष निवडून आणले आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात काँग्रेसनं चांगली कामगिरी केली आहे. अहिल्यानगर, कोल्हापूर जिल्ह्यात काँग्रेसचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार विजयी झाले आहेत. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ७ ठिकाणी नगराध्यक्ष विजयी झाले आहेत. माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उरुण ईश्वरपूर, आष्टा नगरपालिकेत पक्षानं यश मिळवले. रायगडमधील उरण येथे देखील राष्ट्रवादीच्या भावना घाणेकर विजयी झाल्या. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीत स्थानिक पदाधिकाऱ्यांवर निर्णय सोपवले होते. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ८ ठिकाणी नगराध्यक्ष विजयी झाले आहेत. सोलापूरमधील कुर्डूवाडी, रायगडमधील श्रीवर्धन यासह इतर ठिकाणी शिवेसना ठाकरे गटाचे नगराध्यक्ष विजयी झाले आहेत.

-------------

### ज्येष्ठ पत्रकार नागनाथ

ओळख आहे गेल्या अनेक वर्षापासून ते वृत्तपत्रात काम करतात एकमत तरुण भारत चंपावती पत्र गावकरी आदर्श गावकरी लोकमंथन या दैनिकात त्यांनी अंबाजोगाई तालुका प्रतिनिधी म्हणून काम केले होते सध्याचे दैनिक लोकतंत्र चे तालुका प्रतिनिधी म्हणून कार्यरत होते गेल्या तीन महिन्यापासून ते आजारी असल्याने एका जागेवर होते मात्र आज रविवारी त्यांचे दुःखद निधन झाले वारात कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे

-----------

### वाघ, बिबट्यांच्या हल्ल्यात

उपाययोजनांची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.राज्यात आधी मानव आणि वाघ संघर्ष गंभीर होता. आता त्यामध्ये बिबट्याची भर पडली आहे. उसाचे क्षेत्र असलेल्या भागात वाघ नजरेस पडतात. उसाची लागवड झाल्यानंतर थेट तोडणीलाच मजूर फडात जातात. लागवड ते तोडणीमध्ये किमान चार ते पाच महिन्यांचे अंतर असते. या कालावधीत उसात शिरलेली मादी पिलाला जन्म देते. जंगलात नैसर्गिक वाढ न झालेल्या या पिलांना झाडावर चढण्याचा किंवा शिकारीचा सराव नसतो. त्यामुळे मोठी झालेली ही पिल्ले नजरेस दिसणारे ऊस तोडणी मजूर किंवा फडालगत असलेल्या मानवी वस्तीत हल्ले करतात. अशा प्रकारचे हल्ले रोखण्यासाठी उपाययोजना आवश्यक आहे.

-----------------

### अंबडच्या नगराध्यक्षपदी

नगरसेवक निवडून आले तसेच शरदचंद्र पवार गटाचे चार नगरसेवक विजय झाले अजित पवार गटाचे एक उमेदवार विजयी झाला तसेच काँग्रेस पार्टीचा एक उमेदवार विजय झाला. ही निवडणूक शांततेमध्ये कोणतेही अनुचित घटना न घडता पार पडली अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिली. यावेळी उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी ,सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, विभागीय पोलीस अधिकारी डॉ सिद्धेश्वर धुमाळ, पोलीस निरीक्षक चैतन्य राठोड, पोलीस निरीक्षक संतोष घोडके, या पोलीस प्रशासनाच्या वतीने कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच भाजपचे नगरसेवक उज्वल देविदास कुचे सगळ्यात कमी वयाचा उमेदवार विजयी झाला आमदार नारायण कुचे यांच्या पुतण्या तसेच माजी नगराध्यक्ष देविदास कुचे यांचे मुलगा आहे उज्वला निवडून आणण्यासाठी आमदार नारायण कुचे व देविदास कुचे यांना मोठी मेहनत घ्यावी लागली.बाबर ज्योती कृष्णा१५४० भाजप, गंगाधर मच्छिंद्र वराडे २००७ भाजप, सगळ्यात कमी वयाचा उमेदवार कुचे उज्वल देविदास १०९६ भाजप, कुलकर्णी सविता सौरभ ११५५ भाजप, ताराबाई बबनराव शहाणे ९८२ भाजप, माजी आमदार विलास खरात यांचे चिरंजीव खरात विश्वजीत विलासराव १११० भाजप, अर्जुन नारायण भोजने ७४९ नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), अस्मा परवीन अफरोजखान पठाण८४४ नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), जाधव बंडू साहेबराव१२९६ भाजप, खरात मंगल दिलीप१२५१ भाजप, सचिन लक्ष्मण खरात १६७५ राष्ट्रीय समाज पक्ष, शेख बदरुन्नीसा बेगम खुर्शीद अहेमद १५५० राष्ट्रीय समाज पक्ष, हाश्मी नुरजहा मुश्ताक (नाजाभाई) १३८९ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शेख फेरोज शेख अजीज १४२२ भाजप, पदमाबाई बाबुराव वराडे ८९४ भाजप , कुलकर्णी केदार भवानीदास १००३ भाजप भाजप, बुर्ले ललीता जितेंद्र ८०८ नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), खरात संदिप साहेबराव ९४२ नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), रंजना बाळुभाऊ खरात ७९० भाजप, राम भिवराजी लांडे ७३४ अजित पवार गट नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राऊत विठ्ठलसिंग नारायणसिंग (राणा) भाजप, गुडे सावित्री सुरेश ७४० भाजप, यावेळी निवडणूक शांततापणे पार पडली.

-------------

### टिईटी परीक्षेची अंतरिम

ऑनलाइन आलेल्या आक्षेपांचा विचार करून विषय तज्ज्ञांच्या अभिप्रायानुसार अंतिम उत्तरसूची लवकरच जाहीर करण्यात येईल, असे राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी स्पष्ट केले आहे.

--------------

### आ.मुंडे –मुंदडा वगळता सोळुंके, पंडित,

अनेक वर्षापासून पापा मोदी यांचे नगरपालिकेवर वर्चस्व होते मात्र यावेळी आमदार नमिता मुंदडा यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा हे स्वतः भाजप पुरस्कृत उमेदवार होते. येथील जनतेने गेल्या अनेक वर्षांची पापा मोदी यांची सत्ता उलथून टाकली आणि भाजपाचे नंदकिशोर मुंदडा यांना नगराध्यक्षपदी निवडून दिले. धनंजय मुंडे, पंकजा मुंडे आणि नमिता मुंदडा यांनी आपले मतदारसंघ शाबूत ठेवले, मात्र इतर आमदारांना आपल्या मतदारसंघातील पालिका जिंकता आल्या नाहीत. त्यांच्या विरोधामध्ये निकाल गेले. गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या उभा केलेल्या उमेदवाराचा मोठ्या मताधिक्याने पराभव झाला तर नगरसेवकांची संख्या देखील बोटावर मोजण्या इतकीच आली. त्यांच्याच शेजारी लागून असलेल्या माजलगाव मतदार संघाचे लोकप्रतिनिधी प्रकाश दादा सोळुंके यांना देखील माजलगावकरांनी डावलले. या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे चाऊस यांनी बाजी मारली. चाऊस यांच्या जोडीला मोहन जगताप, बाबुराव पोटभरे यांची साथ लाभल्याने त्यांनी सहजच प्रकाश सोळुंके यांच्या उमेदवाराचा पराभव केला. नुसता पराभवच नव्हे तर मतदानामध्ये तिसऱ्या क्रमांकाला फेकले गेले. त्यांच्याच मतदारसंघात धारूर मध्ये मात्र प्रकाश सोळंके यांना यश मिळाले तेही निसटते. याबरोबरच बीड विधानसभेचे लोकप्रतिनिधी संदीप क्षीरसागर यांना देखील जनतेने नाकारल्याचे दिसून आले. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार थेट तिसऱ्या क्रमांकावर गेल्याने त्यांनाही बीडच्या जनतेने नाकारल्याचे दिसून आले. कधी नव्हे ते इतिहासात बीडमध्ये भाजपाने १५ पेक्षा अधिक नगरसेवक निवडून दिले, तर नगराध्यक्षपदाचा उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर राहिला. एकंदरीत आजच्या निकालावरून मुंडे, मुंदडा वगळता सोळुंके, क्षीरसागर, पंडित यांना त्यांच्याच मतदारसंघातील नागरिकांनी डावलल्याने पराभव स्वीकारावा लागला.

--------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. २२ डिसेंबर २०२५



## थोडक्यात



बीड : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची ॲड. प्रकाश कवठेकर यांनी घेतली सदिच्छा भेट

### ध्यानधारणेचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश



आष्टी । प्रतिनिधी

जागतिक ध्यान दिनानिमित्त आष्टी शहरातील माऊली मंदिर परिसरात ध्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागतगीताने करण्यात आली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक _मार्गदर्शन करत असताना ते म्हणाले की आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या गोष्टीचे टेन्शन आहे त्याकरिता ध्यानधारणा सर्वोत्तम पर्याय असून आपण दररोज किमान अर्धा तास तरी ध्यानधारणा केली तर नक्कीच आपल्याला जेवणामध्ये बदल घडलेला दिसतो विद्यार्थ्यांनी देखील मेडिटेशन करणे हे गरजेचे आहे सध्या मोबाईलच्या युगामध्ये जास्तीचे मोबाईल वापर असल्याने प्रत्येक विद्यार्थी व्यक्ती हा आपल्या दिनचर्यामध्ये विसर पडल्यासारखा वागत आहे विद्यार्थी अभ्यासाकरिता एकाग्रता येण्याकरिता ध्यानधारणा करणे हा सर्वोत्तम पर्याय असल्याचे प्रविण जाधव यांनी सांगितले. जागतिक ध्यान दिनाच्या निमित्ताने माऊली मंदिर आष्टीच्या प्रांगणामध्ये सामूहिक ध्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ध्यान मास्टर दिलीप कदम व प्रवीण जाधव यांनी उपस्थित त्यांना ध्यानाचे महत्त्व सांगून प्रत्यक्ष ध्यान करून घेतले.या शिबिरासाठी ह भ प तांदळे महाराज, मुख्याध्यापक महेश शिंदे, भाऊसाहेब कोकणे, पांडुरंग चव्हाण, डॉक्टर शामदिरे, राहुल शेठ मुथा, जगन्नाथ सोनवणे, शहादेव तांदळे, पत्रकार शरद रेडेकर, कवी हरीश हातवटे, प्रा. चाळक सर, सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी सुनीता उगले मॅडम या मान्यवरांसह आष्टी परिसरातील शिक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बीड : आंबेडकर भवन नगर रोड बीड येथे बाबाआढाव व पन्नालाल सुराणा यांना अभिवादन करताना शेरजमा पठाण, संतोष निकाळजे, बबनराव आंधळे व इतर

# ये तो सिर्फ झांकी है, जि.प.अभी बाकी है - ना.पंकजाताई मुंडे

## भाजप कार्यालयात नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवकांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

बीड नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांचा निसटता पराभव झाला असला, तरी त्यांना तब्बल ३३ हजारांचे मताधिक्य मिळाले. बीड शहरातून भाजपचे १५, तर जिल्हाभरातून तब्बल ६० नगरसेवक विजयी झाले आहेत. अंबाजोगाईत नंदकिशोर मुंदडा, गेवराईत गीता बाळराजे पवार आणि परळीत महायुतीच्या पद्मश्री धर्माधिकारी नगराध्यक्ष झाल्या आहेत. ''नगरपालिका निवडणूक झांकी है, जिल्हा परिषद अभी बाकी है'' असे म्हणत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका ताकदीने लढविण्याचे संकेत दिले.

भारतीय जनता पक्षाच्या ऐतिहासिक विजयानंतर बीड येथील भाजप जिल्हा कार्यालयात रविवारी (दि.२१) सायंकाळी विजयी नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना ना.पंकजाताई मुंडे बोलत होत्या.त्या पुढे म्हणाल्या की, बीड शहरात डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यावर जबाबदारी देण्यात आली होती. त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. बीडमध्ये भाजपने ऐतिहासिक यश मिळवत १५ जागा जिंकल्या. पराभूत उमेदवारांनी खचून न जाता नव्या जोमाने कामाला लागावे. गेवराईत बाळराजे



पवार, अंबाजोगाईत नंदकिशोर मुंदडा आणि परळीत महायुतीच्या उमेदवाराने मोठ्या मताधिक्याने विजय मिळविला. धारूर आणि माजलगावमध्ये अनपेक्षित निकाल लागले असून, त्या पराभवाचे चिंतन करून पुढील वाटचाल ठरवली जाईल. राज्यभरात भाजपला मोठे यश लाभले असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले. याप्रसंगी ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते विजयी नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, पंकजाताई मुंडे यांच्या यशस्वी रणनीतीमुळे भाजपला जिल्ह्यात घवघवीत

### भाजप कार्यालयात कार्यकर्त्यांची गर्दी; विजयाची जोरदार घोषणाबाजी

बीड नगरपरिषद निवडणुकीत भाजपने ऐतिहासिक यश संपादन करून शहराच्या राजकारणात आपली ताकद पुन्हा सिद्ध केली आहे. या विजयानंतर भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून मोठ्या संख्येने कार्यकर्ते भाजप कार्यालयात जमा झाले होते. याठिकाणी फटाक्यांची आतिषबाजी व ढोल ताशांच्या निनादात पंकजाताईंचे जोरदार स्वागत झाले. यावेळी ''मुंडे साहेबांचा बालेकिल्ला, बीड जिल्हा बीड जिल्हा'', ''पंकजाताई तुम आगे बढो'' अशा जोरदार घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

यश मिळाले, त्याबद्दल भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे आभार मानले. कार्यक्रमाला भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, डॉ.योगेश क्षीरसागर, ॲड.सर्जेराव तांदळे, नवनाथ शिराळे, भाजप नेते माधव निर्मळ, गेवराईच्या नगराध्यक्षा गीता बाळराजे पवार, बीड नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांच्यासह भाजपच्या जिल्हा व शहर कार्यकारणीतील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धामणगाव उपबाजार पेठ शुभारंभास मोठ्या संख्येने उपस्थित रहा-तांबोळी

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टी तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती, कडा अंतर्गत धामणगाव येथे उभारण्यात आलेल्या उपबाजार पेठेचा भव्य शुभारंभ सोहळा सोमवार दि. २२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वा.लोकनेते आ.सुरेश धस यांच्या शुभ हस्ते धामणगाव येथे उपबाजार पेठ आवारात मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमास शेतकरी,व्यापारी, ग्रामस्थ व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कडा कृ.उ.बा.समिती सभापती रमजान नूरमहंमद तांबोळी यांनी केले आहे.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ. साहेबरावजी दरेकर, माजी आमदार आष्टी/पाटोदा/शिरूर विधानसभा मतदारसंघ राहणार असून उद्घाटन आमदार सुरेश धस यांच्या शुभहस्ते होणार आहे.

या शुभारंभ प्रसंगी बद्रिनाथ जगताप,संजय गाढवे एन. टी. गर्जे, संजना रावसाहेब गाढवे, अशोक गर्जे, बंडु तळेकर, ॲड.साहेबराव म्हस्के,संजय





महाजन,खंडू हाके,दिपक पवळ,दत्ताभाऊ काकडे,विकास पवार, प्रल्हाद मुळीक,संजय चितळे, शांतीलाल भोसले, मोहन आमटे,नंदकिशोर करांडे,शत्रुघ्न मरकड,रमेश तांदळे,भरत भवर, लक्ष्मण नन्नवरे,दत्तात्रय खोटे,ज्योतीबा महाडीक यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या उपबाजार पेठेमुळे धामणगाव व परिसरातील शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी जवळची, सुसज्ज व पारदर्शक बाजारपेठ उपलब्ध होणार असून शेतकऱ्यांचा वेळ व खर्च वाचणार आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी ही उपबाजार पेठ मैलाचा दगड ठरणार असल्याचे सभापती रमजान तांबोळी यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून सभापती रमजान नूरमहंमद तांबोळी, उपसभापती नामदेव आनंदराव धोंडे व सचिव हनुमंत किसन गळगटे उपस्थित राहण्याची विनंती केली आहे.यावेळी संचालक मंडळातील संजय ढोबळे, अशोक पवार, राम मधुरकर,संजय मेहेर, मधुकर सायंबर,अण्णासाहेब लांबडे,राजेंद्र गव्हाणे,मुरलीधर फसले,पंडित पोकळे, रामदास शेंडगे,बाबासाहेब शेकडे,राजू हुलगे,जयश्री तळेकर,छायाबाई अशोक लगड,वंदना गायकवाड,बेबीनंदा नागरगोजे यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समिती कडा येथील सर्व कर्मचारी वृंद उपस्थित राहणार आहे.उया भव्य शुभारंभ सोहळ्यास शेतकरी, व्यापारी, ग्रामस्थ व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन शेवटी सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे.

## गंगाई-बाबाजी महोत्सवातर्फे उद्योजक बाळासाहेब भुकन यांना राज्यस्तरीय आदर्श उद्योजक पुरस्कार जाहीर



आष्टी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील नव्हे तर शेजारी जिल्ह्यातील देखील विविध क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या व्यक्तींना शिक्षण महर्षी भीमरावजी धोंडे हे गेल्या अनेक वर्षापासून आपल्या आई-वडिलांच्या प्रित्यर्थ गंगाई बाबाजी महोत्सव आयोजित करतात या महोत्सवामध्ये काही मान्यवर व्यक्तींना पुरस्कार देऊन ते सन्मानित करतात असाच उद्योजकाचा पुरस्कार अगदी शून्यातून विश्व निर्माण करणारे टाकळी आम्ही या येथील एका गरीब कुटुंबातील सिव्हिल इंजिनिअर पदावर जाऊन पुण्यासारख्या बारामती सारख्या तसेच आष्टीत देखील फार मोठ्या प्रमाणावर बांधकामे , विविध कामे दर्जेदार करणारे इंजिनिअर बाळासाहेब भुकन यांना यावर्षीच्या गंगाई बाबाजी उद्योजक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे

भगवान महाविद्यालय, यांच्या वतीने वेधे गंगाई बाबाजी महोत्सवाचे

## पत्रकार संतोष सानप यांना गंगाई बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष आणि दैनिक लोकाशाचे आष्टी तालुका प्रतिनिधी संतोष सानप यांना यंदाचा मानाचा गंगाई बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांच्या दोन दशकांच्या प्रदीर्घ आणि निष्पक्ष पत्रकारितेची दखल घेऊन हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.



संतोष सानप यांनी सन २००३ मध्ये पत्रकारितेच्या क्षेत्रात पदार्पण केले. आपल्या लेखणीच्या माध्यमातून जनसामान्यांचे प्रश्न प्रशासनासमोर मांडण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. गेल्या १३ वर्षांपासून ते दैनिक लोकाशाचे आष्टी तालुका प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. सध्या ते आष्टी तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष म्हणूनही जबाबदारी सांभाळत आहेत. ग्रामीण भागातील प्रश्न पोटतिडकीने मांडणारा एक अभ्यासू पत्रकार म्हणून त्यांची ओळख आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

## पिंपरखेड वाचनालयात माता भिमाई व राष्ट्रसंत गाडगे बाबा स्मृतिदिन

वडवणी । प्रतिनिधी

छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय, पिंपरखेड येथे माता भिमाई रामजी आंबेडकर व राष्ट्रसंत गाडगे महाराज यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त सहाय्यक ग्रंथपाल सौ. शिलाताई सुखदेव उजगरे यांनी माता भिमाई व संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन केले.

या दिनानिमित्त वाचक असणारा विद्यार्थी वर्ग यांनी माता भिमाई आंबेडकर व संत गाडगे महाराजांच्या जीवन चरित्रावर आपले अनमोल विचार मांडले. माता रमाईचा खडतर प्रवास आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जडणघडण व माता भिमाईचा असणारा वारसा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना लाभल्यामुळे खऱ्या अर्थानं त्यांचे व्यक्तिमत्त्व शारीरिक, मानसिक सुदृढ होते असे विचार यानिमित्त व्यक्त करण्यात आले.

संत गाडगे महाराज यांच्या कार्याबद्दल बोलताना, ग्रंथपाल उजगरे यांनी असे सांगितले की संत गाडगे महाराज यांनी कर्मकांडावर, अंधश्रद्धेवर, रुढीपरंपरेवर, जातीव्यवस्थेवर प्रभावी विचार मांडले. व गावागावात जाऊन स्वच्छतेचा मंत्र, उपदेश न करता तो प्रत्यक्षात घडवून आणण्यासाठी हातात झाडू घेऊन सर्व रस्ते झाडणे व रस्ते झाडण्याबरोबरच सायंकाळी किर्तन आयोजित करून माणसाचे डोके सुद्धा साफ करणे व समाज परिवर्तनाचे महान कार्य या संतांनी केलेलं आहे.माता भिमाई यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यां महापुरुषांना जन्माला घातल्यामुळे एक महान व्यक्तिमत्व भारत देशाला जडणघडण करण्यासाठी मिळाले. असेही मत व्यक्त करण्यात आले. व संत गाडगे महाराज यांचे विचार सर्वांनी आत्मसात करावे व महापुरुषांचे विचार आत्मसात करून आपल्या जीवनाची वाटचाल चांगल्या पद्धतीने करावी अशी भावना ग्रंथपाल सौ. शिलाताई सुखदेव उजगरे यांनी व्यक्त केली.

वाचनालायाचे सचिव प्रा. प्रकाश खळगे सर यांनी सर्वांचे आभार मानले. आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. या निमित्त विद्यार्थी वर्ग फार मोठ्या प्रमाणामध्ये उपस्थित होता.

प्रसंगाचे महत्व

माता भिमाई रामजी आंबेडकर व राष्ट्रसंत गाडगे महाराज यांचा स्मृतिदिन साजरा करण्याचा उद्देश त्यांच्या आदर्श जीवनाचे अनुसरण करणे हा आहे. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचा संकल्प या कार्यक्रमातून व्यक्त करण्यात आला.

पान ६ वरुन...

### परळीत ना.पंकजाताई मुंडे

पवन मुंडे, पूजा तोतला, योगेश मेनकुदळे आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसच्या विजयी नगरसेवकांनी विजयी झाल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांची यश:श्री निवासस्थानी भेट घेऊन आभार व्यक्त केले. याप्रसंगी ना. पंकजाताई यांनी सर्वांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. आमदार धनंजय मुंडे हे देखील याप्रसंगी उपस्थित होते, त्यांनी देखील हर्षोल्हासात पंकजाताईंना शुभेच्छा दिल्या. दरम्यान महायुतीच्या कार्यकर्त्यांनी यश:श्री निवासस्थानी गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतिषबाजी केली. याप्रसंगी ''मंडे टू संडे, गोपीनाथ मुंडे'', ''मुंडे साहेब अमर रहे''च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

### गंगाई-बाबाजी महोत्सवातर्फे

आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

महोत्सब समितीचे स्व गताध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे व संयोजन समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी जाहीर केले की, टाकळी (अमिया) येथे मूळ रहिवासी असलेले उद्योजक बाळासाहेब

भुकन यांना आदर्श उद्योजक हा राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येणार आहे.

बाळासाहेब भुकन हे आशी व पुणे येथे बांधकाम व्यवसायात सक्रिय असून त्यांनी या क्षेत्रात दर्जेदार कामगिरी करून ठसा उमटवला आहे.या उल्लेखनीय यशाची दखल घेऊनच त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात येत आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भुकन यांचे अभिनंदन केले आहे आणि शुभेच्छांनी त्यांचा गौरव केला आहे.

### माजलगावकरांनी पुन्हा

महेमुद हबीब (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार), ब -अत्तार आयशाबानो फारूक (अपक्ष),प्रभाग १०:- अ) नीला गोविंद इतापे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार), ब - इम्रान आगा खान (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार),प्रभाग ११:- अ) फरहत इद्रिस शेख (एम.आय.एम), ब - मतीन अहेमद शेख (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट),प्रभाग १२:- अ) सुलोचना मरिबा प्रधान (राष्ट्रीय काँग्रेस), ब - सय्यद रफिक अली (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट),प्रभाग १३:- अ) उषा अशोक लांडगे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार), ब - रेहानाबी हारून शेख (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट )हे उमेदवार विजयी झाले आहेत.

न.प.मधील पक्षीय बलांबल

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार : १०

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट : १०

भारतीय जनता पार्टी : ०१

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस : ०१

ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एम आय.एम.) : ०१

अपक्ष : ०३

दोन माजी नगरध्यांक्षाचा पराभव

माजलगाव नगर परिषदे माजी नगराध्यक्ष सौ. सुमन माणिकराव मुंडे यांचा प्रभाग एक मधुन पराभव झाला तर माजी नगराध्यक्ष शेख मंजुर यांचा प्रभाग क्रं ११ मधुन फक्त १२७ मते घेत दारुण पराभव झाला आहे.

विद्यमान ११ नगरसेवकांचा झाला पराभव

माजलगाव नगर परिषद निवडणुकीत नगरसेवक असलेल्या ११ नगरसेवकांचा पराभव झाला असुन यामध्ये प्रभाग क्रं. ०१ मधुन सौ.सुमन माणिकराव मुंडे, प्रभाग क्रं. ०२ मधुन तालेब चाऊस, प्रभाग क्रं ०४ मधुन कविता विनायक रत्नपारखी, प्रभाग क्रं ०६ मधुन सौ. लता अच्युत लाटे, प्रभाग क्रं. ०५ मधुन राजश्री नितीन मुंदडा, प्रभाग क्रं. ०८ मधुन तोफिक पटेल, प्रभाग क्रं. ०९ मधुन सौ.सिमा नारायण होके, प्रभाग क्रं १० मधुन रोहन घाडगे, प्रभाग क्रं. ११ मधुन शेख मंजुर, प्रभाग क्रं १२ मधुन सौ.उषाताई महादेव बनसोडे तर प्रभाग क्रं. १३ मधुन सौ. सुदामती सुदाम पौळ या विद्यामान नगरसेवकांचा पराभव झालेला आहे.

### परळी नगर पालिकेत शिवसेनेने

या निकालामुळे सचिन मुळूक यांचे नेतृत्व पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

शिवसेनेच्या शिंदेंकडून माजी नगराध्यक्ष देशमुख यांचा पराभव

राज्याचे लक्ष लागलेल्या परळी नगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार व्यंकटेश शिंदे यांनी माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांचा ८३० मतांनी पराभव केला. शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या नेतृत्वाखाली लढविण्यात आलेल्या या निवडणुकीत मिळालेल्या विजयामुळे परळीतील राजकीय समीकरणे शिवसेनेच्या बाजूने झुकली असून, शिवसेनेचा दबदबा अधिक ठळक झाला आहे.

### गिताभाभी पवार यांच्यासह

या निकालामुळे मोठा धक्का बसला आहे.

एकूण २० नगरसेवकांच्या जागांपैकी तब्बल १६ जागांवर भाजपचे उमेदवार विजयी झाले असून, राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ ४ जागांवर समाधान मानावे लागले आहे. नगराध्यक्षपदासाठी भाजपच्या गिताभाभी (गीता त्रिंबक उर्फ बाळराजे) पवार यांनी तब्बल ५०५४ मतांनी दणदणीत विजय मिळवला आहे.

या निवडणुकीत भाजपच्या मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे बंधू बाळराजे पवार आणि माजी राज्यमंत्री बदामराव पंडित एकत्र आल्याने भाजपची ताकद अधिक भक्कम झाली होती. या राजकीय एकीचा फायदा भाजपला झाला. गेवराई नगरपरिषद निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली होती. या निवडणुकीत मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत ७३.२९ टक्के मतदान केले होते. वाढलेल्या मतदान टक्केवारीमुळे निकालाबाबत सर्वच राजकीय पक्ष व उमेदवारांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली होती. सोमवारी सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होऊन नगराध्यक्ष पदासह १० वार्डातील निकाल दुपारी १२ वाजेपर्यंत जाहीर झाले. भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसने अतिशय प्रतिष्ठेच्या केलेल्या या लढतीत भाजपने बाजी मारली. भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार गीता त्रिंबक उर्फ बाळराजे पवार यांना पहिल्या फेरीपासून सुरु असलेली आघाडी शेवटच्या फेरीपर्यंत कायम राहून त्यांना १३,२४६ मते तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार दाभाडे शितल महेश यांना ८,२१० मते पडली. या लढतीत गिताभाभी पवार यांचा तब्बल ५०५४ मतांनी विजय झाला. तर बागवान जबीन जानमहंमद (राष्ट्रवादी शरद पवार गट) २५३, महाजन साधना मुकेश (शिंदे शिवसेना) ८६, साळवे संदीप मारोती (राष्ट्रीय काँग्रेस) ५४, संगिता शाम गायकवाड (अपक्ष) २०२ मते पडली. तर १० प्रभागातील २० नगरसेवक पदांपैकी १६ नगरसेवक भाजपचे तर केवळ ४ नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडून आले आहेत. या निकालाने गेवराईच्या राजकारणात भाजपचे वर्चस्व अधिक सिद्ध झाले आहे. दरम्यान निवडणूक निकालानंतर शहरात भाजप कार्यकर्त्यांकडून जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. तर पोलिस प्रशासनाकडून नगरपरिषद परिसर तसेच शहरात तगडा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

### धारूर नगरपालिका

ही प्रशासकीय कालावधी नंतर तब्बल आठ वर्षानंतर झाली या निवडणुकीत राज्यातील सत्ताधारी महायुतीतील तीन ही पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गट, भाजपा, व शिवसेना एकनाथ शिंदे या तिन ही पक्षानी स्वबळावर ही निवडणूक लढले व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटही या निवडणुकीत उतरला होता या निवडणुकीमध्ये सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आ. प्रकाशदादा सोळंके यांनी प्रतिष्ठेची केली होती त्यांनी या ठिकाणी नगरपालिकेत असणारी भाजपची सत्ता ही घालवण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावली व शहरात उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची सभा ही घेतली व प्रशासकीय कालावधी या शहराचा पाणी प्रश्न व रस्त्याचा प्रश्न मार्गी लावला यामुळे नगरपरिषद निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बालासाहेब जाधव व भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार रामचंद्र निर्मळ यांच्यात अटीतटीची लढत झाली मात्र राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे बालासाहेब जाधव हे ६६६ मतांनी नगराध्यक्षपदी निवडून आले नगराध्यक्ष पदाच्या फेऱ्यात भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यामध्ये सातत्याने चुरसी दिसून येत होती कारण दोन फेऱ्यांमध्ये भाजपा पुढे होते तर पहिल्या एक फेरी व शेवटच्या फेरीत राष्ट्रवादी काँग्रेसचे पुढे गेल्याने या ठिकाण राष्ट्रवादी काँग्रेसचे बालासाहेब जाधव हे नगराध्यक्षपदी निवडून आले तर नगरसेवक पदामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटास अकरा जागा तर भाजपा सहा जागा या ठिकाणी मिळाल्या व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात तीन जागा मिळाल्या तीन प्रभागांमध्ये हे दोन वेगवेगळ्या पक्षाचे उमेदवार निवडून येण्याची ही प्रकार घडले नागरिकांनी नवीन चेहऱ्यांना नगरपालिकेत मोठ्या प्रमाणात संधी दिल्याचेही या चेहऱ्यावरून दिसून येत आहेत व ही नगरपरिषद निवडणूक भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात चांगली चुरशीची वाटीत तिची झाली हे मात्र दिसून आले व या विजयानंतर शहरात फटाक्याची आतिषबाजी करत आनंदोत्सव साजरा करण्यात आला

### अंबाजोगाईच्या नगराध्यक्षपदी

मोदी आणि नंदकिशोर मुंदडा यांच्या मध्ये ही सरळ निवडणूक झाली. निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर सुरुवातीपासूनच नगराध्यक्ष पदासाठी रस्सीखेच झाल्याची तर मोदी गटाचे सर्वाधिक नगरसेवक विजय होतील असा कयास बांधला जात होता आणि अखेर तसेच होऊन ही रस्सीखेच नंदकिशोर ची मुंदडा यांनी जिंकली आणि राजकिशोर मोदी गटाचे २० नगरसेवक विजय झाले

नगराध्यक्ष पदाच्या सुरु झालेल्या मतमोजणीत पहिल्या राऊंडमध्येच नंदकिशोर मुंदडा यांनी २०० मतांची आघाडी घेवून आपली घोडदौड सुरू केली आणि शेवटच्या फेरीपर्यंत ही घोडदौड कायम ठेवली. सहाव्या फेरी अखेर २४९७

मतांची आघाडी घेवून नंदकिशोर मुंदडा विजयी झाले.

नंदकिशोर मुंदडा यांच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणूक प्रचाराची धुरा सुरुवातीपासूनच आ. नमिता मुंदडा आणि अक्षय मुंदडा यांनी यांनी आपल्या खांद्यावर घेतली होती. या दोघांपैकी अक्षय मुंदडा यांनी न. प. निवडणूका जाहीर होण्यापूर्वी योगेश्वरी मंदीर परीसरातील उद्यानाच्या भुमीपुजननाच्या औपचारिक कार्यक्रमात केलेल्या भाषणात अक्षय मुंदडा यांनी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार करण्याअगोदरच केलेल्या आपल्या संयमी भाषणात येणाऱ्या निवडणुकीत आ. नमिता मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली ही नगर परिषद ताब्यात दिली तरच शहराचा खरा विकास आम्हाला करता येईल हा सुरु धरला होता. पुढे हा सुरु कायम धरत अक्षय मुंदडा यांनी निवडणूक प्रचारात आघाडी मारली. नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत नंदकिशोर मुंदडा यांची उमेदवारी निश्चित झाल्यानंतर अक्षय मुंदडा यांनी प्रचारात आघाडी मारली. नगर परिषदेच्या मागील काळात झालेल्या भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे पुराव्यासह चव्हाट्यावर आणली. आपल्या प्रचार भाषणात सातत्याने अक्षय मुंदडा यांनी हे मुद्दे प्रभावीपणे मतदारांसमोर मांडले. यांचा खुप मोठा परीणाम या निवडणुकीत मतदारांवर झालेला दिसतो.

विधानसभा निवडणुकीत आ. नमिता मुंदडा यांना विजयी करण्यासाठी नंदकिशोर मुंदडा यांनी आखलेल्या व्युह रचनेमुळे आ. नमिता मुंदडा यांच्या विजय झाला तर नगर परिषदे निवडणुकीत अक्षय मुंदडा यांची व्युहरचना नंदकिशोर मुंदडा यांना विजयी करण्यात कामी आली.

अक्षय मुंदडा हे गेली २० वर्षांपासून राजकारणात सक्रिय आहेत. राजकारणात काम करीत असतांना अक्षय मुंदडा यांनी मागील काही वर्षात स्वतः ला खुप डेव्हलप करुन घेतले आहे. आपल्या भाषणाचा स्तर, बोलण्यातला स्पष्ट आणि मुद्देसूद पणा या निवडणुकीत मतदारांवर प्रभाव करणारा ठरला. अक्षय मुंदडा यांची ही डेव्हलपमेंट या निवडणुकीत प्रकर्षाने दिसून आली. या निवडणुकीत अक्षय मुंदडा यांची प्रचाराची शैली पाहता अंबाजोगाई शहर परिवर्तन जन विकास आघाडीचे ते ब्रँड अँबेसिटर ठरल्याने नंदकिशोर मुंदडा यांच्या विजयाचे शिल्पकार ख-या अर्थाने अक्षय मुंदडा हेचं ठरले असेच म्हणावे लागेल.

नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत नंदकिशोर मुंदडा हे विजयी झाले असले तरी त्यांना नगरसेवक पदाचे उमेदवार अधिक निवडून आणण्यात त्यांना यश मिळाले नाही. राजकिशोर मोदी यांच्या गटाचे जवळपास २० तर नंदकिशोर मुंदडा यांच्या गटाचे ११ नगरसेवक या निवडणुकीत विजयी झाले आहेत. त्यामुळे नगर परिषदेचा कारभार सर्व नगर सेवकांना सांभाळून करतांना नंदकिशोर मुंदडा यांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

# आंबा पिकावरील ‘लीफ वेबर’

पूर्वी पाने गुंडाळणारी अळी (लीफ वेबर) ही कीड आंबा पिकावर दुय्यम स्वरूपाची कीड म्हणून ओळखली जाई. मात्र या वर्षी अनेक ठिकाणी या किडीने तीव्र प्रादुर्भाव केल्याचे चित्र आहे. प्रादुर्भावाच्या बाबतीत ही कीड मुख्य किडींशी स्पर्धा करताना आढळली आहे. बदलत्या हवामान परिस्थितीमुळे गेल्या काही वर्षांत या किडीचे प्रादुर्भाव वाढत वाढत असून, ती आंबा पिकासाठी एक गंभीर व लक्षवेधी कीड ठरत आहे. पाने गुंडाळणारी अळीचा प्रादुर्भाव साधारणतः जून महिन्यापासून सुरू होऊन डिसेंबर महिन्यापर्यंत आढळतो. अळीची सुरुवातीची अवस्था पानांवरील हरितद्रव्य खरडून त्यावर उपजीविका करते. त्यानंतर पुढील अवस्थांमध्ये अळी पाने एकत्र गुंडाळून जाळे तयार करते. त्या जाळ्याच्या आत राहून पाने कुरतडते. जवळून निरीक्षण केल्यास प्रभावित पाने सुकलेली, जाळ्याने घट्ट गुंडाळलेली व अळीच्या विष्ठेने भरलेली दिसून येतात.

अंडी अवस्था मादी पतंग पानांच्या खालच्या पृष्ठभागावर, प्रामुख्याने मध्य शीर किंवा शिरांच्या जवळ, अंडी एकटी-एकटी किंवा गटाने घालते. अंडी हिरवट-फिकट रंगाची, अंडाकृती व चपट्या आकाराची असतात. एक मादी पतंग आपल्या संपूर्ण जीवनकाळात सरासरी ५७ ते ६१ अंडी देऊ शकते. अंड्यांची लांबी सुमारे ०.९७ मि.मी. व रुंदी ०.६७ मि.मी. इतकी असते. अंडी



उबविण्याच्या काही तास आधी त्यांचा रंग फिकट गुलाबी होतो. अंडी साधारणतः ३ ते ९ दिवसांत उबतात. अळी अवस्था नुकत्याच उबवलेल्या अळ्या गुलाबी ते फिकट हिरव्या रंगाच्या असून डोके तपकिरी रंगाचे असते. अळीच्या एकूण ७ अवस्था (इन्स्टार) आढळतात. पूर्ण वाढ झालेल्या अळ्या हिरवट-करड्या रंगाच्या असून, डोके गडद तपकिरी असते. प्रोथोरॅक्सवर तपकिरी ठिपके स्पष्टपणे दिसून येतात. पूर्ण वाढ झालेल्या अळीची लांबी सुमारे २८.६४ मि.मी. व रुंदी ३.५० मि.मी. इतकी असते. अळी अवस्था साधारणतः ४० ते ४२ दिवसांत पूर्ण होते.

कोष अवस्था पूर्ण वाढ झालेली अळी जाळीने गुंडाळलेल्या पानांच्या आत रेशमी व मजबूत कोष तयार करते. या कोषावर अळीची जुनी कात व विष्ठा चिकटलेली आढळते. कोष गडद तपकिरी रंगाचा असून तो पुढील बाजूस रुंद व मागील बाजूस निमुळता असतो. कोषाची लांबी १२.५५ ते १३.८० मि.मी. व रुंदी ४.४५ ते ५.७६ मि.मी. इतकी असते. कोष अवस्था साधारणतः ११ ते १५ दिवसांची असते.

प्रौढ अवस्था (पतंग) प्रौढ कीटक मध्यम आकाराचा, करड्या रंगाचा पतंग असतो. त्याचे पुढील पंख तपकिरी रंगाचे, तर मागील पंख फिकट पांढरट रंगाचे असतात. पतंगाच्या शरीराची लांबी ११.८५ ते १३.३८ मि.मी. असून पंख पसरल्यावर रुंदी १०.९३ ते १२.१७ मि.मी. इतकी असते. मादी पतंग नरापेक्षा आकाराने मोठी असते. प्रौढ पतंग साधारणतः ४ ते ५ दिवस जिवंत राहतो. किडीचा संपूर्ण जीवनक्रम ५८ ते ६२ दिवसात पूर्ण होतो.

नुकसानीचे स्वरूप सुरुवातीच्या अवस्थेतील लहान अळ्या पानांच्या वरच्या पृष्ठभागावरील हिरवा भाग (क्लोरोफिल) खरवडून खातात. त्यामुळे पानांवर पांढुरके किंवा करडे ठिपके दिसू लागतात. तिसऱ्या अवस्थेपासून अळ्या रेशीमसदृश धाग्यांच्या साह्याने सुरुवातीला ३ ते ४ पाने एकत्र गुंडाळून जाळे तयार करतात. जसा किडीचा प्रादुर्भाव वाढत जातो, तसतशा अळ्या शेजारच्या पानांकडे स्थलांतर करतात व आधीच्या जाळ्याला नवीन पाने जोडून मोठ्या आकाराचे जाळे निर्माण करतात. या जाळ्याच्या आत राहून अळ्या पानांचे ऊतक कुरतडून खातात.

व्यवस्थापन जाळी केलेली पाने अळी व कोष यांसह काढून गोळा करून नष्ट करावीत.

काराबिड भुंगा (शा. नाव - परेना लॅक्टिसिंक्टा) आणि रिड्यूव्हिड भक्षक (ओइकामा प्रजाती) यांसारख्या उपयुक्त भक्षकांचे संवर्धन करावे.

# दिन विशेष

## जागतिक दिवस:
## राष्ट्रीय गणित दिवस : सूर्याच्या उत्तरायणास प्रारंभ : उत्तर गोलार्धात वर्षातील सर्वात छोटा दिवस

### महत्वाच्या घटना

१२४१ : ला मंगोल चे प्रमुख बहादुर तैर हुलागु खान यांनी लाहोर ला ताब्यात घेतले.
१८४३ : लारवींद्रनाथ टागोरयांचे वडील देवेंद्रनाथ टागोर यांनी ब्रह्म समाज स्वीकारला होता.
१८५१ : जगातील पहिली मालगाडी रुरकी येथे सुरु करण्यात आली.
१८८२ : थॉमस एडिसन यांनी शोध लावलेल्या लाईट्स चा वापर करून पहिले लाईट्स चे क्रिसमस ट्री सजविल्या गेले.
१८८५ : सामुराई इटो हिरोबुमी जपानचे पहिले पंतप्रधान झाले.
१९१० : अमेरिकेत पहिल्यांदा डाक बचत प्रमाणपत्र जरी केल्या गेले.
१९२१ : भारतातील विश्वभारती विद्यापीठ सुरु झाले.
१९३७ : न्यूयॉर्क मधील “द लिंकन” या टनलला वाहतुकीसाठी उघडल्या गेले.
१९४० : मानवेंद्र नाथ राय यांनी रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीची स्थापना केली.
१९४७ : इटली च्या संसदेने नवीन संविधान स्वीकारले.
१९६६ : जवाहरलाल नेहरूविद्यापीठाची स्थापना भारतीय संसद द्वारे केल्या गेली.
१९७१ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक अजिंक्य पाटील यांचा जन्म.
१९७१ : सोवियत संघाने जमिनीखाली अणुबॉम्ब ची चाचणी केली होती.
१९७८ : थायलंड नेसंविधानालास्वीकार केले.
१९९५ : प्रसिद्ध रंगकर्मी के. एन. पणीक्कर यांना मध्य प्रदेश सरकारचा ’कालिदास सन्मान’ जाहीर
२०१० : अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी समलैंगिकतेच्या कायद्यावर आपली स्वाक्षरी केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६६६ : गुरू गोविंद सिंग शिखांचे १० वे गुरू (मृत्यू: ७ आक्टोबर १७०८)
१८५३ : भारतीय तत्त्वज्ञ सरदादेवी यांचा जन्म. (मृत्यू: २१ जुलै १९२०)
१८८७ : श्रीनिवास रामानुजन थोर भारतीय गणिती. ’पार्टिशन फंक्शन’च्या रचनेवर त्यांनी मूलभूत संशोधन केले. (मृत्यू: २६ एप्रिल १९२०)
१९२९ : भारतीय-पाकिस्तानी क्रिकेटर वझीर मोहम्मद यांचा जन्म.
१९४७ : भारतीय क्रिकेटपटू दिलीप दोषी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५८ : भारताचे प्रसिद्ध क्रांतिकारक तारकनाथ दास यांचे निधन.
१९४५ : श्रीधर कृष्णाजी कुलकर्णी तथा ’पठ्ठे बापूराव’ रसाळ लावण्या लिहीणारे लावणीसम्राट (जन्म: ११ नोव्हेंबर १८६६)
१९७५ : पेडर रोडवरील टोपीवाला देसाई यांच्या निवासस्थानात लिफ्टमधून खाली उतरत असताना लिफ्ट नादुरुस्त झाल्याने संगीतकार वसंत देसाई यांचा मृत्यू झाला. ’राम जोशी’, ’अमर भूपाळी’, ’दो आँखे बारह हाथ’, ’झनक झनक पायल बाजे’, ’गुँज उठी शहनाई’ आदी गाजलेल्या चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन त्यांनी केले. (जन्म: ९ जून १९१२)
१९८९ : सॅम्युअल बेकेट आयरिश लेखक, नाटककार, कवी आणि दिग्दर्शक (जन्म: १३ एप्रिल १९०६)
१९९६ : रामकृष्ण धोंडो तथा तात्या बाक्रे संगीत समीक्षक व पत्रकार
२००२ : दिलीप कुळकर्णी प्रायोगिक व व्यावसायिक रंगभूमीवरील चतुरस्त्र अभिनेते
२०११ : वसंत रांजणे मध्यमगती गोलंदाज (जन्म: २२ जुलै १९३७)

# डिसेंबरमध्ये पिकवा या भाज्या; मिळेल भरपूर आर्थिक फायदा



आपल्या देशातील अनेक राज्यांमध्ये डिसेंबर हा शेतकऱ्यांसाठी खूप फायदेशीर महिना मानला जातो. या हंगामात अशी पिके येतात जी केवळ वेगाने वाढतातच असे नाही तर त्यांना चांगला बाजारभाव सुद्धा मिळतो. डिसेंबरच्या हिवाळ्यात पिकणारी पिके देखील खास असतात कारण त्यांना जास्त काळजी घेण्याची आवश्यकता नसते. थंड वारा, रात्रीचे तापमान आणि सकाळचा सौम्य सूर्यप्रकाश त्यांच्या वाढीसाठी परिपूर्ण असतो. परंतु अनेक शेतकऱ्यांना माहिती नसते कि डिसेम्बर महिन्यात नेमकि कोणती शेती करावी. आज आम्ही तुम्हाला अशा काही पिकांबद्दल सांगणार आहोत ज्याची लागवड तुम्ही डिसेंबर महिन्यात करू शकता. कारण या पिकांना थंडीचे हे दिवस अनुकूल राहतात, थंडीचे वातावरण या पिकांना पोषक असते. या पिकांची लागवड करून तुम्ही अगदी कमी खर्चात चांगले उत्पन्न काढू शकता.

पालक : हिवाळा हा हिरव्या पालेभाज्यांचा असतो आणि पालक त्यापैकी सर्वात प्रसिद्ध आहे. तो कॅल्शियम, लोह, जीवनसत्त्वे अ आणि क यांचा समृद्ध स्रोत आहे. डिसेंबरच्या थंड हवामानात पालकची लागवड सर्वात यशस्वी होते आणि ती सुमारे ६-८ आठवड्यांत कापणीसाठी तयार होते.

भोपळा : भोपळ्याच्या अनेक जाती थंड हवामानात वाढतात. लागवड करणे सोपे आहे आणि वनस्पती जलद वाढते. डिसेंबर मध्ये पेरणी केलेल्या भोपळ्यांना चांगले उत्पादन आणि चांगली बाजारभाव देखील मिळतो. सलगम : शलगम ही या हंगामातील सर्वात आरोग्यदायी भाज्यांपैकी एक आहे. त्यात अँटिऑक्सिडंट्स, फायबर आणि खनिजे भरपूर असतात. थंड डिसेंबर महिन्यांत लागवड करणे सोपे असते आणि ४०-६० दिवसांत पीक तयार होते.

वांगी : वांगी लागवडीसाठी थंडीचे दिवस सर्वोत्तम मानला जातो. ६ तास सूर्यप्रकाश, चिकणमाती माती आणि चांगल्या निचऱ्याच्या परिस्थितीत वांग्याची झाडे लवकर वाढतात. वांगी लवकर पिकतात आणि वर्षभर त्यांची मागणी कायम असते. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी वांग्याची लागवड अत्यंत फायदेशीर ठरते. डिसेंबर आणि जानेवारी हा शेतकऱ्यांसाठी कमी मेहनत, कमी खर्च आणि जास्त नफा मिळवण्यासाठी सर्वोत्तम काळ मानला जातो. त्यामुळे हा काळात केलेली शेती फायदेशीर ठरते असं बोललं जाते.

# शेतकऱ्यांनी रब्बी पिकांचे असे करावे व्यवस्थापन

सध्या काही ठिकाणी रब्बी हंगाम पेरणी झाली आहे. आता काही पिकात आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. अगोदर लागवड झालेल्या काही पिकांवर किडी आणि रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सध्याच्या परिस्थितीत विविध पिकांचे नियोजन कसे करावे याकडे शेतकऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.



पूर्व हंगामी उसाची लागवड लवकरात लवकर संपवावी. ऊस लागवड करतांना ३० किलो नत्र, ८५ किलो स्फुरद व ८५ किलो पालाश (३२७ किलो १०:२६:२६ किंवा १८५ किलो डायअमोनियम फॉस्फेट + १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश किंवा ६५ किलो युरिया + ५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट + १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रति हेक्टरी खतमात्रा द्यावी. ऊस पिकावर खोड किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २० % २५ मिली किंवा क्लोरॅन्ट्रानोलीप्रोल १८.५% ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ऊस पिकावर पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३० % ३६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. हळद पिकात कंदमाशीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी १५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५% २० मिली किंवा डायमिथोएट ३० % १५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आलटून-पालटून फवारणी करावी. हळदीचे उघडे पडलेल कंद मातीने झाकून घ्यावेत. हळद पिकात आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. हळदीच्या पानावरील ठिपके / करपा रोग याच्या व्यवस्थापनासाठी अझोक्सिस्ट्रॉबिन १८.२% + डायफेनकोनॅझोल ११.४% (पुर्वमिश्रित बुरशीनाशक) १० मिली + ५ मिली स्टीकरसह प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. जोमदार वाढीसाठी हरभरा पीक सुरुवातीपासूनच तण विरहीत ठेवणे आवश्यक आहे. पीक २० ते २५ दिवसाचे असतांना पहिली कोळपणी करावी. मागील काही दिवसात किमान तापमानात झालेल्या घटीमूळे, वेळेवर लागवड केलेल्या करडई पिकात माव्याचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३०% १३ मिली किंवा असिफेट ७५% १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. करडई पिकात तणांच्या व्यवस्थापनासाठी पेरणीनंतर २५ ते ५० दिवसापर्यंत एक ते दोन कोळपण्या व खुरपणी करून घ्यावी. लवकर पेरणी केलेल्या रब्बी ज्वारी पिकात लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वरील किटकनाशकांची आलटून पालटून पावसाची उघड बघून फवारणी करावी. फवारणी करत असतांना किटकनाशक पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी.

फळबागेचे व्यवस्थापन : संत्रा/मोसंबी बागेत फळवाढीसाठी ००:००:५० १५ ग्रॅम प्रति लिटर तसेच जिब्रॅलिक ॲसिड १ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. संत्रा/मोसंबी बागेत आंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे व आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. डाळींब बागेत फळवाढीसाठी ००:००:५० १५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. डाळींब व चिकू बागेत आंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे व आवश्यकतेनूसार पाणी द्यावे.

# रब्बी ज्वारीमध्ये एक कोळपणी महत्त्वाची

जमिनीतील ओलावा हा पावसावर प्रमाणावर आणि जमिनीच्या खोलीवर अवलंबून असतो. पडणाऱ्या एकूण पावसापैकी १० ते २० टक्के पाणी जमिनीवरून वाहून जाते. बाकीच्या पाण्यापैकी १० टक्के पाणी निचऱ्याद्वारे, तर ६० ते ७० टक्के बाष्पीभवनाद्वारे निघून जाते. त्यामुळे जमिनीत केवळ १० टक्के पाणी उपलब्ध राहते. त्यासाठी पावसाचे वाहून जाणारे पाणी, निचऱ्याद्वारे आणि बाष्पीभवनाद्वारे वाया जाणारे पाणी जास्तीत जास्त साठवून त्याचा पीक उत्पादनासाठी फायदा करून अत्यंत आवश्यक आहे.

कोरडवाहू शेतीच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. याच अनुषंगाने कोरडवाहू शेती संशोधन केंद्र, सोलापूर येथे अभ्यास करून काही महत्त्वाच्या तंत्राचा शेतीमध्ये अवलंब करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने बांधबंदिस्ती, आंतरबांध व्यवस्थापन, उतारास आडवी मशागत करणे, कोळपणी करणे, आच्छादनाचा वापर, शेततळी, जैविक बांध या सारख्या उपायांवर भर देण्यात आला. जमिनीत ओल टिकवून ठेवण्याच्या उपायाआधी जमिनीतील ओल कशी कमी होते हे पाहणे महत्त्वाचे आहे. जमिनीत साठवून राहिलेली ओल पिकांनी वापरणे, पृष्ठभागावरून बाष्पीभवनामुळे ओल उडून जाणे, भेगा पडल्यामुळे त्यातून बाष्पीभवन होणे, तणांवाटे ओल नष्ट होणे या चार मार्गांनी जमिनीतील ओल कमी होते. त्यातील पिकाच्या प्रत्यक्ष वाढीसाठी अतिशय कमी प्रमाणात ओल लागते. बहुतांशी (सुमारे ६० टक्के) ओल ही बाष्पीभवनामुळे उडून



जाते. त्यासाठी वरील उपायांचा अवलंब केल्यास कमी होणाऱ्या ओलीचा बंदोबस्त करणे शक्य होते.

एक कोळपणी आणि अर्धे पाणी : पीक वाढताना त्यासोबत शेतात तणही वाढत असते. हे तण पाणी, अन्नद्रव्ये आणि सूर्यप्रकाश यासाठी मुख्य पिकांसोबत स्पर्धा करते. पीक उगवून आल्यावर त्यात ठराविक दिवसानंतर कोळपणी केली जाते. त्याचा मुख्य उद्देश तण नष्ट करणे आणि वाया जाणारी ओल थोपवण्यासाठी होतो. तणांच्या प्रादुर्भावामुळे कमी होणारी ओल, तणांचा बंदोबस्त केल्याने टिकवून ठेवली जाते. याशिवाय कोळपणी केल्यामुळे जमिनीच्या पृष्ठभागावर एक पोकळ थर तयार होतो. त्यामुळे उडून जाणारी ओल थोपविता येते. यामुळे ओल टिकवून धरण्यामध्ये ‘कोळपणी’चा फार मोठा वाटा आहे. रब्बी हंगामात कोळपणी अत्यंत महत्त्वाचा भूमिका बजावते. एकदा कोळपणी केली, तर जवळपास एक पाणी दिल्याप्रमाणे फायदा होतो. या तत्त्वाचा अवलंब करून कोरडवाहू शेती तंत्रामध्ये रब्बी ज्वारीकरिता तीन वेळेस कोळपणी करण्याची शिफारस करण्यात आली आहे. पहिली कोळपणी पीक तीन आठवड्यांचे झाल्यानंतर फटीच्या कोळप्याने करावी. त्यामुळे शेतात वाढणारे तण नष्ट होऊन पाण्याचा होणारा अपव्यय टाळता येतो. दुसरी कोळपणी पीक पाच आठवड्यांचे झाल्यानंतर, पासेच्या कोळप्याने करावी. त्या वेळेस जमिनीतील ओल कमी झाल्याने जमिनीला सूक्ष्म भेगा पडण्यास सुरुवात झालेली असते. या कोळपणीमुळे या भेगा बुजण्यास मदत होते. त्यामुळे बाष्पीभवनाची क्रिया मंदावते. तिसरी कोळपणी पीक आठ आठवड्यांचे झाल्यानंतर करावी. या कोळपणीसाठी दातेरी कोळपे वापरण्याची शिफारस आहे. या काळात जमीन टणक झाली असल्याने फासाचे कोळपे व्यवस्थित चालत नाही. तिसऱ्या कोळपणीसाठी दातेरी कोळपे वापरल्यास ते मातीत व्यवस्थित घुसून माती मोकळी होऊन भेगा बुजविल्या जातात. जमिनीत ओल फार कमी असेल, त्यावेळी आणखी एखादी कोळपणी केल्यास फायदेशीर ठरते.

# उसाला तीन हजार ५५० रुपये भाव द्या

## युवा शेतकरी संघर्ष समितीची मागणी

जालना : शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य सन्मान देत साखर कारखान्यांनी उसाला तीन हजार ५५० रुपये प्रतिटन एफआरपी द्यावा, अन्यथा युवा शेतकरी संघर्ष समिती तीव्र आंदोलन उभे करेल, असा इशारा तीर्थपुरी (ता. घनसावंगी) येथे आयोजित इशारा मेळाव्यात देण्यात आला. मेळाव्यात उपस्थित शेतकरी नेत्यांनी कारखानदारांच्या धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

कॉ. राजन क्षीरसागर यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील अनेक साखर कारखान्यांकडून ऊसाचे पैसे वेळेत दिले जात नाहीत. कारखान्यांनी दर न दिल्यास कारवाईची तरतूद असतानाही प्रत्यक्षात कारवाई होत नाही. तेलंगणा व पश्चिम महाराष्ट्रात उसाला चांगला दर मिळतो, मात्र मराठवाड्यातील शेतकऱ्यांवर अन्याय का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. खते, बियाणे, मजुरी, पाणी, वीज, ट्रॅक्टर व सिंचन खर्च प्रचंड वाढले असताना उसाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. दुसरीकडे साखर कारखाने इथेनॉल, सहवीजनिर्मिती, मोलॅसिससारख्या उपपदार्थांतून मोठा नफा कमावत असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले. मागण्या मान्य न झाल्यास रास्ता रोको, ऊसतोड व वाहतूक बंद, कारखाने बंद पाडण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी युवा शेतकरी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# तत्कालीन एसपी रंजनकुमार शर्मा दोषी

## दिलासा सभागृह बांधकाम प्रकरणी कारवाईचे न्यायालयाचे आदेश

अहिल्यानगर । प्रतिनिधी

नगर शहरात पोलिसांनी उभारलेल्या दिलासा सभागृहाच्या बांधकाम प्रकरणी नगरचे तत्कालिन पोलिस अधीक्षक रंजनकुमार शर्मा दोषी ठरले आहेत. त्यांच्या विरोधात तीन महिन्याच्या आत कारवाई करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठाने दिले आहेत. या प्रकरणी नगरमधील सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी खंडपीठात फौजदारी याचिका दाखल केली होती. शर्मा यांच्यावर कारवाईचे आदेश झाल्याने पोलिस दलात खळबळ उडाली आहे.

याबाबतची माहिती अशी की, नगर शहरातील छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील (औरंगाबाद रोड) पोलिस अधीक्षक निवासस्थानाशेजारी (जुने शहर वाहतूक कार्यालयाच्या जागी) अवैध निधीतून बांधण्यात आलेल्या दिलासा सेंटर सभागृहाच्या बेकायदा बांधकामाबाबत तत्कालीन पोलिस अधीक्षक रंजनकुमार शर्मा यांना खंडपीठाने दोषी ठरवून त्यांच्यावर तीन महिन्यात कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाची माहिती अशी की, २०१९ मध्ये पोलिसांच्या दिलासा सेल कार्यालयालगत अनधिकृतपणे अवैध मार्गाने जमवलेल्या निधीतून हॉलचे (सभागृह) बांधकाम केले गेले आहे. त्याची चौकशी होऊनही कारवाई करण्यास होत असलेल्या दिरंगाईबाबत तक्रारदार सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी तत्कालीन गृहमंत्री यांच्याकडे ९ ऑगस्ट २०२१ रोजी तक्रार केली होती. त्याआधी त्यांनी २ मार्च २०२१ रोजी अप्पर मुख्य गृह सचिवांकडेही तक्रार केली होती. पण तिची दखल घेतली गेली नाही. त्यामुळे त्यांनी तत्कालीन गृहमंत्री दिलीप वळसेंकडे तक्रार केली. संबंधित हॉल बांधताना कोणतीही कायदेशीर परवानगी घेतली गेली नाही व बांधकामासाठी सरकारी अनुदानाचाही वापर केला गेला नाही. तत्कालीन पोलिस अधीक्षक रंजनकुमार शर्मा यांनी हे बेकायदा बांधकाम केले व त्याची नोंद अहमदनगर महापालिकेकडे आणि शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडेही नसल्याचे माहिती अधिकाराद्वारे मिळालेल्या माहितीतून स्पष्ट झाले असल्याचा दावा तक्रारदार शेख यांनी केला होता. तसेच या हॉल बांधकामाची परवानगी व बांधकाम खर्च याची माहिती पोलिस अधीक्षक कार्यालयाकडेही उपलब्ध झाली नाही. त्यामुळे सुमारे ३० ते ३५ लाखाच्या खर्चातून झालेले हे बांधकाम अवैध मार्गाने निधी मिळवून झाल्याचा त्यांचा दावा होता.

त्यामुळे त्यांनी याबाबत तत्कालीन गृहमंत्री वळसेंकडे केलेल्या तक्रारीवर चौकशी सुरू झाली व गृह मंत्रालयाने पोलिस महासंचालकांकडे याबाबतचा अहवाल मागितला होता. त्यानंतर तत्कालीन पोलिस अधीक्षक मनोज पाटील यांनी या प्रकरणाची चौकशी केली व त्यामध्ये त्यांनी शर्मा व इतर अधिकाऱ्यांना पाठीशी घातले. त्यामुळे शेख यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठ येथे याचिका दाखल केली होती. त्यामध्ये तत्कालीन पोलिस अधीक्षकांच्या अहवालावर तक्रारदार शेख यांच्याकडून झालेल्या युक्तिवादाची दखल खंडपीठाने घेतली. या अहवालात संबंधित हॉल कोणी व कधी बांधला, याबाबत काहीएक माहिती किवा पुरावा उपलब्ध नाही तसेच कोणत्याही अभिलेखावर त्याबाबत नोंद मिळून आलेली नाही, असे स्पष्ट नमूद केले असल्याचे युक्तिवादात स्पष्ट केले. खंडपीठाने त्याची गंभीर दखल घेऊन यासंदर्भात दिलेल्या आदेशात या ओळींचा स्पष्ट उल्लेख करून अशा प्रकारचे भाष्य पोलिस अधीक्षक कसे करू शकतात? त्यांच्या कार्यक्षेत्रात असे बेकायदा बांधकाम होते व ते तुम्हाला माहिती नाही, असे कसे?, असे सवाल उपस्थित केले व असे प्रकार भविष्यात घडता कामा नये म्हणून राज्याच्या मुख्य सचिवांनी (गृह) व पोलिस महासंचालकांनी यासंदर्भात आवश्यक ते धोरण ठरवण्याचे आदेश दिले तसेच तक्रारदार शेख यांनी दिलासा सेल हॉलच्या बेकायदा बांधकामाबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिस महासंचालक यांनी स्वतंत्र प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश दिले. या प्रकरणात पोलिस महासंचालकांनी नाशिक विभागाचे विशेष पोलिस महानिरीक्षक यांना चौकशीचे आदेश केले होते.तत्कालीन विशेष पोलिस महानिरीक्षक बी.जी. शेखर यांनी फेर चौकशी केली असता त्यामध्ये तत्कालीन पोलिस अधीक्षक रंजनकुमार शर्मा दोषी आढळून आले आहेत. शर्मा यांनी अहिल्यानगर जिल्हा पोलिस अधीक्षकांसारख्या महत्त्वाच्या आणि जबाबदार पदावर असताना प्रशासकीय प्रक्रियांचा वापर न करता किंवा अधिकृत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून आराखडा मंजूर न करता सभागृह दुरुस्तीचे काम करण्यात आल्याचे दिसून येते. शर्मा यांनी प्रशासकीय अनियमितता केल्याचे निष्पन्न झाले आहे, असे स्पष्ट नमूद करून तसा अहवाल नाशिक विभागाचे विद्यमान विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनी उच्च न्यायालयात सादर केला आहे. या प्रकरणी दिनांक ९ डिसेंबर रोजी उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठाचे न्यायमूर्ती वाय.जी. खोब्रागडे व संदीपकुमार सी. मोर यांच्यासमोर सुनावणी होऊन न्यायालयाने महाराष्ट्र राज्याच्या पोलिस महासंचालकांना असे आदेश केले आहेत की, आदेशाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत १८ जुलै २०२४ च्या चौकशी अहवालाच्या आधारे शर्मा यांच्याविरोधात प्रशासकीय नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश केले आहेत. या प्रकरणात खंडपीठात तक्रारदार शाकीरभाई शेख यांच्यावतीने वकील ॲड. प्रज्ञा तळेकर व ॲड. अजिंक्य काळे यांनी बाजू मांडली. तर सरकारतर्फे ॲड. ए. बी. गिरासे यांनी काम पाहिले.

## फेरफार रद्द करण्याच्या कारणावरून नवीन तलाठ्याला बदडलं

अंबड । प्रतिनिधी

अंबड तहसिल कार्यालयात शासकीय काम करत असतांना ग्राम महसूल अधिकाऱ्याला शिवीगाळ व मारहाण करण्यात आली सदरील घटना भरदुपारी १२ वाजे सुमारास घडली. या प्रकरणी संबंधित व्यक्ती विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात अधिक माहिती अशी मंडळ अधिकारी श्री नरोटे यांना विचारले असता ते म्हणाले की सदरील व्यक्तीचा अजून फेर लागला नसून सदरील व्यक्तीस समजून सांगितले असता तरीपण सदरील व्यक्तीची मनस्थिती ऐकण्यामध्ये नव्हती यामुळे पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करावा लागला. याबाबत सविस्तर माहिती अशी की, अंबड तहसील कार्यालया अंतर्गत गेल्या एक वर्षांपासून कार्यरत असलेले ग्राम महसूल अधिकारी पवन लिंबाजी तुपकर (वय २९ वर्षे, रा. गुंज, ता. सिंदखेड राजा, जि. बुलडाणा) ह. मु. चांगले नगर, अंबड हे सध्या वडीकाळ्या सर्कलचे कामकाज पाहत आहेत. तसेच त्यांच्याकडे सप्टेंबर २०२५ पासून चंदनापुरी खुर्द सजा अंतर्गत भांबेरी व इतर गावांचाही अतिरिक्त कार्यभार आहे. दरम्यान, १५ डिसेंबर २०२५ रोजी संजय बापुराव कणके (रा. भांबेरी, ता. अंबड) यांनी त्यांच्या आईच्या जमिनीवरील मृत्यूपत्रा आधारित फेरफार तात्काळ रद्द करण्याची मागणी केली होती. त्यावेळी फेरफार प्रकरण मंडळ अधिकाऱ्यांकडे सुनावणीसाठी प्रलंबित असून नियमानुसार निर्णय होईल, असे । सांगितल्यावर संबंधिताने शिवीगाळ करत मारहाणीची धमकी दिली होती. त्यानंतर संजय कणके यांनी पुन्हा तहसील कार्यालयात येऊन फेरफार रद्द करण्याची मागणी केली. हे काम आपल्या अधिकार क्षेत्रात नसल्याचे समजावून सांगत असतांनाच कणके यांनी तुपकर यांच्या हातातील कागदपत्रे अंगावर फेकून शिवीगाळ केली तसेच डाव्या गालावर, कानाजवळ चापट मारली शिवाय तुला व मंडळ अधिकाऱ्याला चाकू खुपसून जिवे मारून टाकीन अशी धमकी दिल्याचे सांगण्यात आले. या घटनेवेळी उपस्थित असलेले किरण उद्धव लांडे (सहाय्यक कृषी अधिकारी), अविनाश पांडुरंग देवकर (ग्राम महसूल अधिकारी) व विकाप रामभाऊ डोळसे (महसूल सहाय्यक) यांनी हस्तक्षेप तुपकर यांची सुटका केली. या प्रकारामुळे शासकीय कामात अडथळा निर्माण झाला असून संजय कणके यांच्या विरोधात पवन तुपकर यांच्या फिर्यादीवरून अंबड पोलिस ठाण्यात कलम १३२,१२१ (१), ३५२,३५१ (१) अन्वये तक्रार नोंदविण्यात आली आहे.

## बहुजन समाजाला अंधश्रद्धेतून संत गाडगेबाबांनी काढले बाहेर-ज्ञानदेव पांडुळे

अहिल्यानगर । प्रतिनिधी

राष्ट्रसंत गाडगेबाबा हे समाजसुधारक व प्रबोधनकार होते. हेच त्या काळातले खरे संत होते. संत गाडगेबाबा यांनी बहुजन समाजाला आपल्या प्रबोधनाच्या माध्यमातून अंधश्रद्धेतून बाहेर काढले. कीर्तनात कायम लोकांना लग्नावर खर्च करू नका, जागरण, गोंधळ, यात्रा, जत्रा करू नका, पैसे वाचवून मुलांना शिकवा असे सांगत. बहुजन समाजाला आर्थिक दारिद्र्यातून बाहेर काढण्यात गाडगेबाबांनी मोलाची भूमिका बजावली आहे, असे रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य तथा साहित्यिक ज्ञानदेव पांडुळे यांनी सांगितले. सारसनगर येथील राष्ट्रसंत श्री गाडगे महाराज सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप, अभियंता अनिल मुरकुटे, मनोज शिरसाठे, विनोद सोनवणे, कैलास साळुंखे, गौरव दळवी, कमलेश राऊत आदी उपस्थित होते.



पांडुळे म्हणाले, संत गाडगेबाबा यांनी स्वच्छतेचे महत्व त्या काळात सर्व समाजाला समजावून सांगितले होते. कीर्तन करण्याच्या अगोदर सर्व गाव स्वच्छ करायचे. त्यांनी शैक्षणिक चळवळीला देखील मोठा हातभार लावला होता.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेला त्यांनी मोठी मदत केली होती. त्यांच्या प्रयत्नांमुळेच रयत शिक्षण संस्थेच्या शाखांचा विस्तार होऊ शकला, असे त्यांनी सांगितले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिवाजी राऊत, अंबादास सोनवणे, गंगनाथ सोनवणे, संजय राऊत, दत्तात्रय दळवी, मधुकर सोनवणे, सुभाष भागवत आदींनी या कार्यक्रमासाठी शहरासह उपनगरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी सूत्रसंचालन व आभार दीपक आरडे यांनी मानले. यावेळी परिसरातील नागरिक देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजाला सांगितले स्वच्छतेचे महत्व संत गाडगेबाबा यांनी स्वच्छतेचे महत्व त्या काळात सर्व समाजाला समजावून सांगितले होते. कीर्तन करण्याच्या अगोदर सर्व गाव स्वच्छ करायचे. त्यांनी शैक्षणिक चळवळीला देखील मोठा हातभार लावला होता.

## कडाक्याच्या थंडीतही शिंगणापुरात शनिभक्तांचा उत्साह

### शनिअमावस्येला २ लाख भाविकांची गर्दी, प्रशासनाचे काटेकोर नियोजन

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शनिवारी, शनिअमावस्येच्या पवित्र पर्वानिमित्त शनिशिंगणापूर येथे राज्यभरातून भाविकांची मोठी गर्दी झाली. या वर्षीच्या शनि अमावस्येचा पर्वकाळ ७ तास १२ मिनिटांचा होता, आणि मध्यरात्री ते पहाटेपर्यंत तापमान सुमारे ७.३ अंश सेल्सिअसपर्यंत गेले. कडाक्याची थंडी असूनही भक्तांचा उत्साह कमी झाला नाही. शनिअमावस्येला दोन लाखांहून अधिक भाविकांनी शनिदेवाचे दर्शन घेतले.

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांपासून ते दिल्ली, हरियाणा, ओरिसा आणि झिम्बाबे येथील भक्त दर्शनासाठी आले होते. शनिशिंगणापूर येथील स्वयंभू शनीमूर्तीचे दर्शन घेण्यासाठी दोन लाखांहून अधिक भाविक एकत्र आले. १९२ दिवसांनी शनिभक्तांनी रात्रीचे शनिदर्शन घेतले. दानशूरांनी महाप्रसादाचे वाटप केले. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन सक्रिय होते. विभागीय आयुक्तांनी स्वीकारला देवस्थानाचा कारभार सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी शुक्रवारी रात्री शनिशिंगणापूर देवस्थानाचा कारभार ताब्यात घेतला. त्यांनी उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे व प्रांत सुधीर पाटील यांना सहाय्यक म्हणून नेमले. दिवसभर देवस्थानातील सर्व अधिकारी व विभाग प्रमुखांना कामकाजाचे निर्देश दिले.

## नेवासे नगरपंचायत निवडणूक : गडाखांना बहुमत, तरी नगराध्यक्षपद महायुतीकडे

अहिल्यानगर । प्रतिनिधी

नेवासे नगरपंचायत निवडणुकीत माजी आमदार शंकरराव गडाख यांच्या क्रांतिकारी शेतकरी पक्षाने दमदार कामगिरी करत दहा जागांवर विजय मिळवला असून पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त झाले आहे. या निकालामुळे नेवासेच्या राजकारणात गडाख यांचे वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. मात्र, असे असतानाही नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार करणसिंह घुले यांनी बाजी मारल्याने या निवडणुकीला वेगळेच राजकीय वळण मिळाले आहे.

नगरपंचायतच्या एकूण जागांपैकी क्रांतिकारी शेतकरी पक्षाला १०, महायुतीला ६ जागा मिळाल्या आहेत. तर एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला असून एका जागेवर आम आदमी पार्टीच्या उमेदवाराने विजय संपादन केला आहे. या आकड्यांवरून स्पष्ट बहुमत गडाख गटाकडे असतानाही नगराध्यक्षपद त्यांच्या हातातून निसटल्याने 'गड आला, पण सिंह गेला' अशीच अवस्था निर्माण झाली आहे. नगराध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत महायुतीने रणनीतीपूर्ण खेळी करत करणसिंह घुले यांना उमेदवारी दिली. विरोधी गटांतील मतांचे विभाजन आणि अपक्ष तसेच आम आदमी पार्टीच्या भूमिकेमुळे घुले यांच्या पारड्यात मतांचा कल गेला. परिणामी, बहुमत नसतानाही महायुतीने नगराध्यक्षपद पटकावून राजकीय वर्तुळात आश्चर्याची लाट निर्माण केली आहे. या निकालानंतर नेवासे तालुक्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. एकीकडे गडाख समर्थकांनी बहुमताचा विजय साजरा केला, तर दुसरीकडे नगराध्यक्षपद हुकल्याने नाराजीही व्यक्त केली जात आहे. अनेक कार्यकर्त्यांनी उघडपणे 'संख्याबळ असूनही सत्ता पूर्णपणे हातात आली नाही' अशी प्रतिक्रिया दिली आहे. राजकीय जाणकारांच्या मते, येत्या काळात नगरपंचायतमध्ये सत्तासंघर्ष तीव्र होण्याची शक्यता आहे. बहुमत क्रांतिकारी शेतकरी पक्षाकडे असल्याने विकासकामांवरील नियंत्रण त्यांच्याकडे राहणार असले, तरी नगराध्यक्ष महायुतीचा असल्याने निर्णयप्रक्रियेत ताणतणाव दिसून येऊ शकतो. एकूणच नेवासे नगरपंचायत निवडणुकीने तालुक्याच्या राजकारणाला नवे समीकरण दिले आहे. गडाख यांना बहुमताचा गड मिळाला असला, तरी नगराध्यक्षपदाचा 'सिंह' महायुतीकडे गेल्याने पुढील राजकीय हालचालींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## हारणी या गोमातेचा महाराष्ट्रातील प्रथमच दशक्रिया विधीनिमित्त कृतज्ञता सोहळा

अहिल्यानगर । प्रतिनिधी

गोसेवा हीच खरी ईश्वर सेवा असल्याचा संदेश देणारा महाराष्ट्रात प्रथमच आयोजित करण्यात येणारा गोमातेचा दशक्रिया विधीनिमित्त कृतज्ञता सोहळा सोमवार दि.२२डिसेबर रोजी सकाळी ९वाजता संपन्न होणार आहे हा आगळावेगळा उपक्रम कृष्णकृपांकित ह.भ.प.डॉ विकासानंदजी महाराज मिसाळ यांच्या संकल्पनेतून साकारत असून हारणी या गोमातेच्या स्मरणार्थ हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे हा कार्यक्रम उरमुडे वस्ती हिवरेबाजार रोड पिंपळगाव वाघा ( संतपंढरी) तालुका व जिल्हा अहिल्या नगर येथे होणार आहे गोमातेचे रक्षण व्हावे तिची सेवा घडावी आणि समाजामध्ये गोसंवर्धनाबाबत कृतज्ञतेची भावना निर्माण व्हावी या उदात्त हेतूने गोपीनाथ उरमुडे यांच्या मनातील धारणा इच्छा व सद्भावनेतून या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कृतज्ञता सोहळ्याच्या प्रसगी कृष्णकृपांकित ह.भ.प.डॉ विकासानंदजी महाराज मिसाळ यांचे प्रेरणादायी प्रवचन होणार असून गोसेवेचे धार्मिक सामाजिक व पर्यावरणीय महत्व ते आपल्या प्रवचनातून विशद करणार आहेत या कार्यक्रमास ह.भ.प. भास्कर महाराज जिल्हाधिकारी डॉ पंकजा आशीया ह.भ.प. पुंडलिक महाराज जंगले शास्त्री मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी ह.भ.प.अक्षय महाराज उगले उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गुंजाळ ह.भ.प. देवदास काका जोशी तहसीलदार संजय शिंदे पद्मश्री पोपटराव पवार सी.ओ.राजेद्र शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर व गोसेवक उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्रात प्रथमच होत असलेला हा गोमातेच्या दशक्रिया विधीचा कृतज्ञता सोहळा समाजाला एक नवी दिशा देणारा ठरणार असून गोसेवेविषयी सकारात्मक संदेश देणारा हा कार्यक्रम बहुसंख्य गोप्रेमींनी उपस्थित राहून यशस्वी करावा असे आवाहन प्रमुख आयोजक गोसेवक गोपीनाथ उरमुडे यांनी केले आहे.

## महावितरणचा 'वाढदिवस' की नियमांची 'ऐशीतैशी'?

### गेवराईत सरकारी आदेशाला केराची टोपली; भ्रष्ट युतीची चर्चा; मुख्यमंत्र्याकडे कारवाईची मागणी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमावलीचा धाक उरलाय की नाही? असा संतप्त सवाल गेवराई तालुक्यातील महावितरण उपविभागीय कार्यालयातील एका धक्कादायक प्रकारामुळे उपस्थित झाला आहे. शासकीय कार्यालयात वाढदिवस, निरोप समारंभ व खाजगी कार्यक्रमांवर शासनाने स्पष्ट बंदी घातलेली असतानाही, येथे एका उप-अभियंत्याचा वाढदिवस थाटामाटात साजरा करण्यात आला. या प्रकारामुळे शासकीय शिस्तीची सर्रास पायमल्ली झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे.

कार्यालयीन वेळेतच टेबल-खुर्च्या हलवून, केक कापत आणि जल्लोष करत हा कार्यक्रम पार पडल्याचे सीसीटीव्ही फुटेज व स्थानिक माध्यमांच्या कॅमेऱ्यात कैद झाले आहे. सरकारी खुर्चीवर बसूनच नियमांना हरताळ फासल्याने



प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या तथाकथित 'वाढदिवस सोहळ्या'त शासकीय अधिकाऱ्यांसह खाजगी कंत्राटदारांची (गुत्तेदारांची) लक्षणीय उपस्थिती सर्वाधिक चर्चेचा विषय ठरली आहे. शासकीय कामांचे कंत्राट घेणारे गुत्तेदार आणि त्यांना मंजुरी देणारे अधिकारी यांचे हे 'बर्थडे कनेक्शन' नेमके काय सूचित करते? सामान्य नागरिकांची कामे वेळेवर न करणाऱ्या या कार्यालयात कंत्राटदारांसाठी मात्र रेड कार्पेट का? असा थेट सवाल डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला असून, या गर्दीमागे केवळ शुभेच्छा नसून संशयास्पद आर्थिक हितसंबंध दडले असण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. या बेजबाबदार व नियमबाह्य प्रकाराची गंभीर दखल घेत डॉ. गणेश ढवळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व विभागीय आयुक्तांकडे पुराव्यासह लेखी तक्रार दाखल केली आहे. सरकारी कार्यालय म्हणजे खासगी इस्टेट नाही. नियम पाळायचे नसतील, तर त्या खुर्चीवर बसण्याचा अधिकार संबंधितांना नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ निलंबनाची कारवाई झालीच पाहिजे; अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल. या गंभीर प्रकारावर महावितरणचे वरिष्ठ अधिकारी कारवाई करतात की नेहमीप्रमाणे पांघरूण घालतात, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. नियमभंग करणाऱ्या या 'बर्थडे बॉय' उप-अभियंत्यावर कठोर कारवाई होते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यात नगराध्यक्ष निवडणुकीचे रणसंग्राम संपले!

### भाजपचा दबदबा आघाड्या-सेनेची सरशी; जिल्ह्याच्या राजकारणाला नवा चेहरा

अहिल्यानगर । प्रतिनिधी

आहिल्यानगर जिल्ह्यातील विविध नगरपालिकांच्या नगराध्यक्ष पदांचे निकाल आज जाहीर झाले असून, या निकालांनी जिल्ह्याच्या राजकीय समीकरणांना नवे वळण दिले आहे. भाजपने बहुसंख्य ठिकाणी विजय मिळवत आपला दबदबा कायम राखला असून, काँग्रेस, शिंदे गट शिवसेना व स्थानिक विकास आघाड्यांनाही काही ठिकाणी यश मिळाले आहे.

नगराध्यक्ष पदांचे विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे राहाता : नगराध्यक्षपदी भाजपचे स्वाधीन गाडेकर विजयी. संगमनेर : शहर विकास आघाडीच्या डॉ. मैथिली तांबे विजयी. देवळाली प्रवरा (ता.राहुरी) : नगराध्यक्षपदी भाजपचे सत्यजित कदम विजयी. पाथर्डी : नगराध्यक्षपदी भाजपचे अभय आव्हाड विजयी. श्रीरामपूर : नगराध्यक्षपदी काँग्रेसचे करण ससाणे विजयी. शिर्डी : नगराध्यक्षपदी भाजपच्या जयश्री थोरात विजयी. श्रीगोंदा : नगराध्यक्षपदी भाजपच्या सुनिता खेतमाळीस विजयी. जामखेड : नगराध्यक्षपदासाठी भाजपच्या प्रांजल अमित चिंतामणी विजयी. शेवगाव : नगराध्यक्षपदी शिंदे गट शिवसेनेच्या माया मुंडे विजयी. राहुरी : नगराध्यक्षपदी विकास आघाडीचे भाऊसाहेब मोरे विजयी. कोपरगाव : नगराध्यक्षपदी भाजपचे पराग संधान विजयी. नेवासा : नगराध्यक्षपदी शिवसेना शिंदे गटाचे करणसिंह घुले विजयी. या निकालांनंतर संबंधित नगरपालिकांमध्ये जल्लोषाचे वातावरण असून,नवनिर्वाचित नगराध्यक्षांवर शहर विकास, नागरी सुविधा आणि पारदर्शक कारभाराची मोठी जबाबदारी येऊन ठेपली आहे. जिल्ह्यातील राजकारणासाठी हे निकाल आगामी काळात महत्त्वाचे ठरणार असल्याचे चित्र आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

सोमवार दि.२२ डिसेंबर २०२५ 

# बीडच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपचे १५ नगरसेवक विजयी

## नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांचा निसटता पराभव

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषद निवडणुकीत भाजपने ऐतिहासिक यश संपादन करत शहराच्या राजकारणात आपली ताकद दाखवून दिली आहे. बीड नगरपरिषदेच्या एकूण ५२ जागांपैकी भाजपचे तब्बल १५ नगरसेवक विजयी झाले असून, बीडच्या इतिहासात प्रथमच भाजपने एवढ्या मोठ्या संख्येने नगरसेवक निवडून आणण्याची कामगिरी केली आहे. यापूर्वी भाजपचा केवळ एक नगरसेवक असायचा. यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांचा मात्र निसटता पराभव झाला.

नगराध्यक्ष पदासाठी भाजपच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांनी अत्यंत चुरशीची व अटीतटीची लढत दिली. मात्र, शेवटच्या टप्प्यात अतिशय कमी मतांनी त्यांचा निसटता पराभव झाला. या निवडणुकीत डॉ.घुंबरे यांना ३२ हजार ३३ मते मिळाली असून, हा वाढता जनाधार भाजपसाठी भविष्यात निश्चितच बळ देणारा आहे, असे पक्षाच्यावतीने सांगण्यात आले. बीड नगरपरिषदेची निवडणूक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप नेत्या, मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली लढविण्यात आली. ऐन निवडणुकीच्या तोंडावर डॉ.क्षीरसागर यांनी भाजपमध्ये प्रवेश करून निवडणुकीची जबाबदारी स्वीकारली होती. त्यांना खंबीर साथ देत जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्यासह सर्वच पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी निवडणुकीत परिश्रम घेतले.



### माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही-डॉ.योगेश क्षीरसागर

बीडकरांनी निवडून दिलेल्या भाजपच्या विजयी १५ नगरसेवकांचे अभिनंदन करतो. आगामी काळात पक्षाचे संघटन वाढवून पुन्हा जनतेत जाऊ. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री पंकजाताई मुंडे यांनी माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, पक्ष वाढीसाठी परिश्रम घेईल, असा शब्द डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिला.

### भाजपच्या विजयी नगरसेवकांची नावे

प्रभाग क्र.२ मधून शुभम दिलीप धूत, सावित्री नितीन साखरे, ४ मधून मीनाताई जाधव, ५ मधून मीना रणजितसिंह चव्हाण, ७ मधून भाग्यश्री देशपांडे, जगदीश गुरखदे, ८ मधून राहुल गुरखुदे, १० मधून मंगेश धोंगडे, भाग्यश्री तांबारे, १२ मधून पूजा राजाभाऊ गुजर, १३ मधून समीक्षा शेटे, सय्यद मुस्तफा, १५ मधून डॉ.सारिका क्षीरसागर, आदित्य माने, २५ मधून ज्योती नंदकिशोर पिंगळे अशी भाजपच्या विजयी नगरसेवकांची नावे आहेत.

### प्रचंड विरोधानंतरही डॉ.सारिका क्षीरसागर विजयी

बीडमधील प्रभाग क्र.१५ च्या उमेदवार डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांना विरोधकांनी प्रचंड विरोध केला. अक्षरशः विरोधक याच प्रभागामध्ये तळ ठोकून होते. तरीही डॉ.सारिकाताई ह्या ७९६ मतांनी विजयी झाल्या. त्यानंतर पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी क्षीरसागर निवासस्थानी गुलाल उधळून जल्लोष केला.

### भाजपचा पहिला मुस्लिम नगरसेवक सय्यद मुस्तफा; शुभम धूत सर्वाधिक मतांनी विजयी

स्व.गोपीनाथराव मुंडे यांना मानणारे आणि भाजपचे नगरसेवक पदाचे उमेदवार मुस्तफा सय्यद यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला आहे. त्यांच्या रूपाने बीडमध्ये भाजपचा पहिला मुस्लिम नगरसेवक झाला. तसेच, शुभम धूत हे सर्वाधिक १५८४ मतांनी विजयी झाले आहेत.

## बीड नगरपरिषद : राष्ट्रवादीच्या प्रेमलता पारवे ३७७९ मतांनी विजयी



नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांना मिळालेली मते
घड्याळ प्रेमलता पारवे - ३५८१२
कमळ डॉ.ज्योती घोमरे - ३२०३३
तुतारी स्मिता वाघमारे - २५४४०
पतंग शृंगारे सुरेखा - ५२९१

**प्रभाग क्र.१ विजयी**
बबिता सुधाकर जाधव (तुतारी)
अशोक मारोती काळे (तुतारी)

**प्रभाग क्र. २**
शुभम दिलीप धूत (भाजप)
सावित्री नितीन साखरे (भाजप)

**प्रभाग क्र.३**
अमर नाईकवाडे (घड्याळ)
रेश्मा सरवदे (घड्याळ)

**प्रभाग क्र. ४**
मीनाताई जाधव (कमळ)
भारत कांबळे (तुतारी)

**प्रभाग क्र.५**
सूरज चुंगडे (घडचाळ/धनुष्यबाण)
मीना रणजितसिंह चव्हाण (कमळ)

**प्रभाग क्र.६**
मोमिन सीमा परवीन अब्दुल (घड्याळ)
जयतुला खान (घड्याळ)

**प्रभाग क्र.७**
भाग्यश्री देशपांडे (कमळ)
जगदीश गुरखदे (कमळ)

**प्रभाग क्र.८**
राहुल गुरखुदे (कमळ)
मनिषा उल्हास गिराम(मशाल/तुतारी)

**प्रभाग क्र.९**
रेखा रणजित पिंगळे (तुतारी)
शेख अथर (तुतारी)

**प्रभाग क्र.१०**
मंगेश धोंगडे (कमळ)
भाग्यश्री तांबारे (कमळ)

**प्रभाग क्र.११**
मोमिन खमर निसा शार्फोद्दीन (तुतारी)
पठाण अफसर खान करीम खान (तुतारी)

**प्रभाग क्र.१२**
सीता भैय्यासाहेब मोरे (घड्याळ)
पूजा राजाभाऊ गुजर (कमळ)

**प्रभाग क्र.१३**
समीक्षा शेटे (कमळ)
सय्यद मुस्तफा (कमळ)

**प्रभाग क्र.१४ विजयी**
प्रमोद शिंदे (घड्याळ)
आरती बनसोडे (घड्याळ)

**प्रभाग क्र.१५**
डॉ.सारिका क्षीरसागर (कमळ)
आदित्य माने (कमळ)

**प्रभाग क्र.१६**
महम्मद नुझहत आरा मुनिरुद्दीन (घड्याळ)
सय्यद फारुकअली शेख इशाक (घड्याळ)

**प्रभाग क्र.१७**
महेश धांडे (घड्याळ)
शेख शबनम बिलाल (घड्याळ)

**प्रभाग क्र.१८**
शेख फरहिन आरशान (तुतारी)
शेख अशपाक शेख इसाक (घड्याळ)

**प्रभाग क्र.१९**
सय्यद सादिक अली महेबुब अली(घड्याळ)
गोडसे मीना (घड्याळ)

**प्रभाग क्र.२०**
सय्यद इलियास (पतंग)
सय्यद शाहनुरबी (तुतारी)

**प्रभाग क्र.२१**
पायल जाधव (घड्याळ)
धर्मराज गुंजाळ (घड्याळ)

**प्रभाग क्र.२२**
शेख शबनम खय्युम (घड्याळ)
शेख निजाम जैनोद्दीन (घड्याळ)

**प्रभाग क्र.२३**
खुर्शिद आलम शाह मोहम्मद (तुतारी)
कुरेशी हिना वाजेद (पंजा)

**प्रभाग क्र.२४**
जोया अनम मोहम्मद मोशिउद्दीन (तुतारी)
शेख अफसर शेख मोहम्मद (तुतारी)

**प्रभाग क्र.२५**
विनोद मुळूक (घड्याळ)
ज्योती पिंगळे (कमळ)

**प्रभाग क्र.२६**
शीतल चक्रे (धनुष्यबाण)
संजय उडान (धनुष्यबाण)

# परळीत ना.पंकजाताई मुंडे यांनी केले विजयी उमेदवारांचे अभिनंदन

**यश:श्री निवासस्थानी गुलालाची उधळण, फटक्यांची आतिषबाजी करत कार्यकर्त्यांचा जल्लोष**



परळी । प्रतिनिधी

परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत शहरातील मतदारांनी ना. पंकजाताई मुंडे आणि आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत भाजपा, राष्ट्रवादी आणि शिवसेना महायुतीच्या उमेदवारांना अभूतपूर्व मताधिक्यानी विजयी केले आहे. नगरपरिषद निवडणुकीत मोठा विजय मिळाल्यानंतर महायुतीच्या विजयी उमेदवार आणि पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी ना. पंकजाताई मुंडे यांच्या यश:श्री निवासस्थानी जल्लोष करत विजय साजरा केला.

महायुतीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी, बाजीराव धर्माधिकारी, नगरसेवक वंदना आघाव, जयश्रीताई मोगरकर, अंजली माळी, पान ३ वर



**गेवराई : नगराध्यक्षपदी विजयी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी संदीप खोमणे यांच्याकडून विजयी प्रमाणपत्र स्वीकारताना भाजपच्या नूतन गेवराई नगराध्यक्ष सौ गीता भाभी बाळराजे पवार. सोबत भाजप नेते बाळराजे पवार आणि भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित.**

# परळीची बदनामी करणाऱ्यांना जनतेने मतांमधून उत्तर दिले - धनंजय मुंडे

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

परळी नगर परिषदेच्या निवडणुकीत धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे या बहीण भावांनी मिळून महायुतीच्या माध्यमातून पुन्हा एकदा एकहाती विजय मिळवत, नगरपरिषदेसह मतदारसंघात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी या तब्बल १५ हजार ६६४ मतांनी विजयी झाल्या आहेत.

दरम्यान परळीतील ३५ पैकी २५ जागांवर महायुतीचे उमेदवार निवडून आले असून सहा जागांवरती महायुतीतील बंडखोर असलेले सहा उमेदवार अपक्ष निवडून आले असून, या सहापैकी पाच उमेदवारांनी महायुतीच्या पॅनलला निकाला दिवशीच पाठिंबा दिला आहे; तर उर्वरित एक उमेदवार ही लवकरच पाठिंबा देणार असल्याचे कळते.



दुसरीकडे तुतारी गटाला केवळ दोन जागांवर विजय प्राप्त करता आला असून, पॅनल प्रमुख दीपक देशमुख यांचा वार्ड क्रमांक सहा मध्ये दारून पराभव झाला आहे. दरम्यान धनंजय मुंडे यांनी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या यश:श्री निवासस्थानी जाऊन पंकजाताईंना शुभेच्छा देत विजयी जल्लोष साजरा केला.

परळीच्या जनतेने आम्हाला वेळोवेळी आशीर्वाद दिले, मात्र मागील काही दिवसांमध्ये परळीच्या मातीची आणि इथल्या माणसांची जी बदनामी राजकीय द्वेषातून केली जात होती, त्याला आज परळीच्या जनतेने मतांमधून उत्तर दिले असल्याचे वक्तव्य धनंजय मुंडे यांनी केले आहे. तर पंकजाताई मुंडे यांनी देखील महाराष्ट्रातील क्वचितच घडलेला संपूर्ण महायुतीचा हा परळी येथील प्रयोग यशस्वी ठरला असून आगामी निवडणुकांमध्ये देखील परळी मतदारसंघात महायुती म्हणूनच आम्ही सामोरे जाऊ असे सूतोवाच करत सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले आहे.

## अंबाजोगाईच्या नगराध्यक्षपदी नंदकिशोर मुंदडा यांची वर्णी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरामध्ये या निवडणूकीमध्ये परिवर्तन होवून राजकिशोर मोदी यांच्याकडून नगराध्यक्ष पद भाजपाचे नंदकिशोर मुंदडा यांच्याकडे आले. त्यांना या निवडणूकीमध्ये २२७७७ मते मिळाली. तर त्यांचे प्रतिस्पर्धी राजकिशोर मोदी यांनी २०२८० मते मिळाली. जवळपास अडीच हजार मताच्या फरकाने नंदकिशोर मुंदडा विजयी झाले.अंबाजोगाईमध्ये पक्षाच्या चिन्हावर निवडणूक न लढविता शहर विकास परिवर्तन, जनविकास आघाडीकडून नंदकिशोर मुंदडा यांनी तर लोकविकास महाआघाडीकडून राजकिशोर मोदी यांनी निवडणूक लढविली. या निवडणूकीमध्ये मोदी गटाला २० जागा तर मुंदडा गटाला ११ जागा मिळाल्या.

अंबाजोगाई नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी अंबाजोगाई शहर परिवर्तन जनविकास आघाडीचे नंदकिशोर जी मुंदडा यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी लोकविकास महाआघाडीचे उमेदवार राजकिशोर उर्फ पापा मोदी यांचा २४९७ मतांनी पराभव केला असून नगर परिषदेमध्ये राजकिशोर मोदी यांच्या गटाची वीस तर मुंदडा गटाचे ११ नगरसेवक विजयी झाले आहेत.

अंबाजोगाई नगर अध्यक्ष पदाचा निकाल नुकताच जाहीर झाला. माजी नगराध्यक्ष राजकिशोर पान ३ वर

## धारूर नगरपालिका भाजपकडून राष्ट्रवादीकडे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर नगरपालिकेत आठ वर्षानंतर झालेल्या निवडणुकीमध्ये सत्तांतर नागरिकांनी घडवले असून राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटाचे बालासाहेब जाधव हे जनतेतून नगराध्यक्षपदी निवडून आले असून या पक्षाने ११ जागा जिंकून स्पष्ट बहुमतही नगरपालिकेत मिळवले आहे. नगराध्यक्ष पदाची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट व भाजपामध्ये अटीतटीची



व चुरशीची झाली. नगरसेवक पदासाठी अनेक नवीन चेहऱ्यांना नागरिकांनी संधी दिल्याचेही स्पष्टपणे दिसून आले आहे

धारूर नगरपरिषद निवडणूक पान ३ वर

# परळी नगर पालिकेत शिवसेनेने गड राखला

**दोन उमेदवार विजयी करत जिल्हाप्रमुख मुळूक यांची रणनीती यशस्वी**

बीड । प्रतिनिधी

परळी नगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेने राजकीय ताकद दाखवत आपला गड पुन्हा एकदा अभेद्य राखला आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी नेतृत्व सिध्द करत दोन उमेदवारांना विजयी करून शिवसेनेचा परळीतील दबदबा कायम असल्याचा स्पष्ट संदेश दिला आहे.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे सचिव संजय मोरे साहेब व संपर्क प्रमुख मनोज शिंदे यांच्या आदेशानुसार, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, बापूसाहेब मोरे व टी. पी. मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक लढविण्यात आली. जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी परळी पालिका निवडणुकीत आखलेली रणनीती, संघटनात्मक ताकद आणि कार्यकर्त्यांची मोट बांधण्याची क्षमता यामुळे शिवसेनेला निर्णायक यश मिळाले. या निवडणुकीच्या अनुषंगाने माझी मंत्री धनंजय मुंडे साहेब व पंकजाताई मुंडे यांचे शिवसेनेला सहकार्य झाले

या निवडणुकीत जयश्री गीते यांना निवडणुकीपूर्वीच बिनविरोध निवडून आणण्यात मुळूक यांना यश मिळाले होते. रविवारी जाहीर



झालेल्या निकालात शिवसेनेचे व्यंकटेश शिंदे यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत विरोधकांचा पराभव केला. दोन जागांवरील या विजयामुळे परळीतील राजकीय समीकरणांवर जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे वर्चस्व अधोरेखित झाले असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी शिवसेना अधिक बळकट झाल्याचे चित्र आहे. पान ३ वर


# माजलगावकरांनी पुन्हा एकदा दादांना डावलले, पालिकेच्या चाव्या चाऊसकडे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील नगर परिषद निवडणुकीत नगराध्यक्षा पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या चाऊस मेहरीन शिफा बिलाल २६२३ मतांनी विजयी झाल्या आहेत.

माजलगाव नगर परिषदेसाठी नगराध्यक्षा पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या चाऊस मेहरीन शिफा बिलाल यांचा २६२३ मतांनी विजयी झाले आहेत तर माजलगाव नगर परिषदेसाठी नगरसेवक म्हणून नगरसेवक पदाचे प्रभागनिहाय विजयी उमेदवार पुढील प्रमाणे प्रभाग ०१:- अ) रेखा प्रल्हादराव सरोदे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट)

ब) शरद रामभाऊ यादव (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरद पवार गट),प्रभाग ०२:- अ) शेख इम्रान शेख बशीर (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट),ब:- उज्वला सचिन जावळे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार गट),प्रभाग ०३,अ) राज सय्यद अहेमद सय्यद नूर (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट),ब - पठाण नाजीया जुनेद खान (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट),प्रभाग ०४:- अ) रेश्मा दिपक मेंडके (अपक्ष),ब - दिपक जालिंदर मेंडके (भारतीय जनता पार्टी),प्रभाग ०५:- अ) होके सुचिता भारत (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार),ब - लंगडे राहुल सुखदेव (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट),प्रभाग ०६ :- अ) गंगाबाई भागवतराव भोसले (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार), ब :- सय्यद लतीफ



दिवाण (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार),प्रभाग ०७:- अ) शेटे वैशाली प्रशांत (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट), ब - शिंदे विजय राजाभाऊ (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट ),प्रभाग ०८:- अ).सय्यद तहुरा मुज्जमिल पटेल (अपक्ष), ब - चाऊस सहालबीन आमेरबीन (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार),प्रभाग ०९:-

अ) कुरेशी पान ३ वर

## गिताभाभी पवार यांच्यासह भाजपाचा एकतर्फी विजय

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई च्या बहाद्दर जनतेने युवा नेते बाळराजे पवार यांच्या वाढदिवसाचे मोठे गिफ्ट म्हणून सौ. गिताभाभी पवार यांच्या पदरात नगराध्यक्ष पदाचे ''कमळ'' टाकून इतिहास केला असून, नगरपरिषदेच्या निवडणुकीत

बाळराजे बाजीगर ठरले आहेत. भाजपाचे वीस पैकी १६ नगरसेवकांचा दणदणीत विजय झाला असून, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार गिताभाभी बाळराजे पवार पाच हजार चौपन्न मतांनी निवडून आल्याने, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा दारूण पराभव झाला आहे. पवारांचा वाडा गुलालाने भरून गेल्याने, हे यश आबा-दादांच्या युतीचे असल्याचे चित्र दिसून आले आहे. दरम्यान,

राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार विजयसिंह पंडित व माजी आमदार अमरसिंह पंडित यांना पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
सोमवार दि.२२ डिसेंबर २०२५ । पान ७

# दिशाभूल करणाऱ्यांचा समाचार घेतल्याशिवाय राहणार नाही ; नीलम गोऱ्हे कडाडल्या

**पुणे । प्रतिनिधी**

शिवसेनेला कमी जागा मिळतील, आम्हाला युती नको अशी दिशाभूल शिवसैनिकांची करू नये. जे कोणी जाणीवपूर्वक अशाप्रकारे दिशाभूल करीत असेल त्यांचा समाचार घेतल्याशिवाय राहणार नाही, असा शब्दांत विधान परिषदेच्या उपसभापती व शिवसेनेच्या नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्पष्ट केले. शिवसैनिकांना चांगली संधी मिळत असेल आणि सन्मानजनक युती होत असेल तर कोणीही संभ्रमावस्था निर्माण करू नका, असा सल्लाही डॉ. गोऱ्हे यांनी दिला.

हिवाळी अधिवेशनातील कामकाजाबाबत माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत शिवसेनेला केवळ ८ जागा मिळतील त्यामुळे अनेक शिवसैनिक नाराज झाले असून, राजीनामा देण्याची तयारी केली आहे. त्यामुळे युती करणार की नाही, असे प्रश्न शिवसेनेच्या नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांना



पत्रकारांनी विचारले असता, डॉ. गोऱ्हे यांनी कोण म्हटले आठ जागा मिळणार. महायुतीची एकच बैठक झाली. त्यामध्ये सन्मानजनपूर्वक युती करण्याचे ठरले आहे. त्यामध्ये जागा वाटपाबाबत कोणतीही चर्चा झालेली नाही, असे असताना विनाकारक शिवसैनिकांमध्ये संभ्रमावस्था पसरवणे चुकीचे आहे. मुद्दामून कोणी असे प्रकार करीत असतील, तर त्यांचा समाचार घेतल्याशिवय राहणार नाही, असेही डॉ. गोऱ्हे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. शिवसेनेकडून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या. जवळपास चारशेहून अधिक इच्छुकांनी मुलाखत दिली. त्यानुसार कोणत्या प्रभागामध्ये आपले प्राबल्य आहे. उमेदवाराची ताकद यांसह अन्य बाबींचा अभ्यास करून पुणे शहरात किती जागा लढविणार याबाबतची माहिती आणि इच्छुक उमेदवारांची सविस्तर यादी २२ डिसेंबरपर्यंत पक्षश्रेष्ठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठविण्यात येणार आहे. त्यामध्ये पदाधिकारी आणि शिवसैनिकांची मते विचारात घेऊनच किती प्रभागात जागा मागणे योग्य राहील हे ठरेल, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. भाजपा-शिवसेना युतीत शिवसेनेला केवळ आठच जागा मिळणार, युतीचा फटका शिवसेनेला बसणार, शिवसैनिकांना न्याय मिळणार नाही अशा तक्रारी करीत काही शिवसैनिकांनी सकाळी शिवसेनेचे पुणे शहर पदाधिकारी व माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्या कार्यालयावर गर्दी केली. तसेच, आम्हाला संधी मिळणार नसेल तर आम्ही राजीनामे देतो, असा पवित्रा घेतल्याचे समोर आले. त्यामुळे शिवसेनेतील नेते ही परिस्थिती कशी हाताळणार, नाराज शिवसैनिकांची मनधरणी कशी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ज्येष्ठाला गाठून सोनसाखळी लुटणारा दुचाकीस्वार अटकेत

**पुणे । प्रतिनिधी**

रस्त्याने चाललेल्या ज्येष्ठ नागरिकाला निर्जनस्थळी गाठून त्याच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन चोरून नेणाऱ्या दुचाकीस्वार चोरट्याला वानवडी पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून गुन्ह्यातील ऐवज व दुचाकी जप्त केली आहे.

उमर नूर खान (वय १८, रा. नवाधीश पार्क, कोंढवा) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. ही घटना १२ डिसेंबर रोजी रामटेकडी परिसरातील मधुबन सोसायटीकडून हिलसाईड अपार्टमेंटकडे जाणाऱ्या रस्त्यावर घडली होती. तक्रारदार ज्येष्ठ नागरिक असून १२ डिसेंबर रोजी ते रामटेकडी परिसरातील टेकडीजवळून जात असताना दुचाकीवरील चार चोरट्यांनी त्यांना अडवून हाताने मारहाण केली. त्यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जबरदस्तीने काढून घेतली आणि चोरटे पसार झाले. याप्रकरणी वानवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होताच पथकाने तपासाला गती दिली. पोलिस



अंमलदार विष्णू सुतार, विठ्ठल चोरमले व अभिजित चव्हाण यांना माहिती मिळाली की टोळक्यापैकी एकजण गंगा सॅटेलाईट सोसायटीजवळील ओढ्यावरील पुलावर दुचाकीवर बसून कोणाची तरी वाट पाहत थांबला आहे. वानवडी ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक अल्फाज शेख व पथकाने घटनास्थळी धाव घेत आरोपी उमर नूर खान याला ताब्यात घेतले. अंगझडतीत त्याच्याकडून सोनसाखळी मिळून आली. ही कामगिरी उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर, सहायक पोलिस आयुक्त नम्रता देसाई, वरिष्ठ पोलिस निरीक्षक भाऊसाहेब पाटील, पोलिस निरीक्षक संगीता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक उमाकांत महाडिक, उपनिरीक्षक अल्फाज शेख तसेच अतुल गायकवाड, दया शेगर, महेश गाढवे, अमोल पिलाणे, विष्णू सुतार, विठ्ठल चोरमले, अभिजित चव्हाण, गोपाळ मदने यांच्या पथकाने केली.

# दारूसाठी आणि पैशांसाठी दोन खून! पोलिसांकडून दुहेरी खुनाचा उलगडा

**पुणे । प्रतिनिधी**

महिन्यात दोन खून करून वेगवेगळ्या शहरांमध्ये लपण्याचा प्रयत्न करणार्या आरोपीचा रक्तरंजित प्रवास अखेर पुणे ग्रामीण पोलिसांनी थांबवला. गेल्या महिन्यात जामखेड येथे खून करून पुणे जिल्ह्यात आलेल्या या आरोपीने सासवडमध्ये दुसरी हत्या केली. त्यानंतर तो पसार झाला. मात्र, सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि सातत्यपूर्ण तपासाच्या माध्यमातून पुणे ग्रामीण पोलिसांच्या पथकाने या दुहेरी खुनांचा पर्दाफाश केला.

९ डिसेंबर रोजी सासवड शहरातील न्यू आनंद वाईन्सच्या मागील बाजूस सुरू असलेल्या बांधकामाच्या इमारतीत जिन्याखाली राजू दत्तात्रय बोराडे (३८, रा. सासवड, ता. पुरंदर) यांचा गळा चिरलेला मृतदेह आढळून आला. खून अत्यंत क्रूर पद्धतीने करण्यात आल्याने या घटनेने सासवड हादरून गेले.मृताच्या भावाने दिलेल्या फिर्यादीनंतर सासवड पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी तपासाची सूत्रे हाती घेतली. घटनेचे गांभीर्य ओळखून अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी आरोपींना पकडण्याच्या सूचना केल्या होत्या. पथकाने घटनास्थळ आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, मृत व्यक्तीसोबत दोन अनोळखी व्यक्ती घटनास्थळाकडे जात असल्याचे स्पष्ट झाले. याच फुटेजमधून तपासाची दिशा ठरली. संशयितांचा शोध घेण्यासाठी कोंढवा, हडपसरसह विविध भागांत पथके रवाना करण्यात आली. दरम्यान, सासवडमधील आनंद वाईन्स येथे दारू खरेदीसाठी आलेला एक संशयित इसम पोलिसांच्या नजरेत आला. चौकशीत त्याने सूरज प्रकाश बलराम निषाद असे नाव सांगितले; मात्र त्याची उत्तरे विसंगत होती. सखोल चौकशीत निषाद याने साथीदार नीरज गोस्वामी याच्यासह खून केल्याची कबुली दिली. त्यानंतर गोस्वामी यालाही ताब्यात घेण्यात आले. दोन्ही आरोपी दारूच्या नशेत असताना वाद वाढत गेले आणि त्यातूनच त्यांनी हा खून केल्याचे समोर आले आहे.चौकशीदरम्यान गोस्वामी याने काही आठवड्यांपूर्वीच जामखेड येथे पैशांच्या वादातून विकास मधुकर अंधारे (२२) याचा खून केल्याची धक्कादायक माहिती समोर आली. त्या घटनेनंतर तो पुणे जिल्ह्यात कामाच्या शोधात आला आणि सासवडमध्ये दारूच्या वादातून दुसर्या खुनाची घटना घडवून आणली. त्यानंतर फरार झालेल्या आरोपीला पोलिसांनी पकडले. पोलीस अधिक्षक संदीपसिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधिक्षक रमेश चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, पोलीस निरीक्षक कुमार कदम, सहायक निरीक्षक वैभव सोनवणे यांच्यासह पथकाने ही कारवाई केली.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विद्यापीठात ‘बोलींचा जागर’ उपक्रम

**पुणे । प्रतिनिधी**

मराठीतील विविध बोलींचे जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या भाषा संचालनालयामार्फत जानेवारी महिन्यात साजऱ्या होणाऱ्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत राज्यातील ३६ जिल्ह्यांत 'बोलींचा जागर' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यासंदर्भात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात बोली अभ्यासक व तज्ज्ञांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

बोली भाषा नष्ट होण्यामागील कारणांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करणे, विविध उपक्रम, कार्यक्रम, सर्वेक्षण व संकलनाच्या माध्यमातून बोलींचे जतन करणे, तसेच बोलींच्या अभ्यासासाठी शैक्षणिक आणि सामाजिक पातळीवर काम करणे,



हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता. 'बोलींचा जागर' हा उपक्रम विद्यापीठ स्तर, बोली अभ्यासक कार्यशाळा आणि प्रत्यक्ष कार्यक्षेत्र अशा तीन टप्प्यांत राबविण्याचे नियोजन असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक व भाषा संचालनालयाचे भाषा संचालक अरुण गीते यांनी तालुका स्तरावर, शिक्षण संस्था व महाविद्यालयांमध्ये बोली तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली किमान तीन तासांचे कार्यक्रम राबवावेत, असे मत व्यक्त केले. बोली म्हणजे केवळ भाषा नसून ती त्या प्रदेशाची संस्कृती, जीवनशैली व लोकस्मृतीचे प्रतिबिंब असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या वेळी १३ बोली अभ्यासकांनी महाराष्ट्रातील विविध प्रदेशांतील बोली, त्या-त्या भागातील संस्कृती, भाषेची लय, शब्दसंपदा, लोकगीते, म्हणी, उखाणे यांसारख्या महत्त्वपूर्ण घटकांवर आपले विचार मांडले. डॉ. सोनल कुलकर्णी यांनी बहुभाषिकतेचे महत्त्व आणि बोलींच्या शास्त्रीय संकलनाची आवश्यकता अधोरेखित केली. डॉ. केशव देशमुख यांनी तरुण साहित्यिकांनी बोलींमधून वाङ्मय निर्मिती करावी तसेच शेतकरी, महिला व सामान्य माणसांच्या बोलींवर संमेलने घ्यावीत, असे मत व्यक्त केले. यावेळी डॉ. बाळकृष्ण लळीत, रेश्मा लवटे, रतन कांबळे, स्वाती सोनावळे, डॉ. सुशील धसकटे, डॉ. मारुती आढळ, डॉ. विजय कांबळे, डॉ. सुनील घनकुटे, रामदास वाघमारे, तुषार पाटील, डॉ. दिलीप कसबे या बोलीभाषा अभ्यासाकांनी विविध बोलींसंदर्भात आपली भूमिका मांडली.

# इन्कम टॅक्स पुणे संघाचा डॉ. आंबेडकर हॉकी चषकावर कब्जा

**पुणे । प्रतिनिधी**

डॉ. आंबेडकर हॉकी स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थानिक क्रीडा प्रबोधिनी संघाचा ४-२ असा पराभव करीत इन्कम टॅक्स पुणे संघाने विजेतेपद पटकाविले.

अंतिम फेरीत राज पवारने (८ व्या मिनिटाला) मैदानी गोल केल्याने आयकर पुणे संघाने सुरुवातीच्या काही मिनिटांतच आघाडी घेतली. त्यानंतर बाबू मेटकरने (१५ व्या मिनिटाला) पेनल्टी कॉर्नरवर गोल करून मध्यंतराला आघाडी २-० अशी वाढवली. उत्तरार्धाच्या सुरुवातीला इन्कम टॅक्स संघाच्या राहुल शिंदेने (३४ मिनिटांनी) मैदानी गोलसह त्यात भर घातली. ०-३ असे पिछाडीवर असताना कार्तिक पठारे (४३ मिनिटांनी, ४९ मिनिटांनी) पेनल्टी कॉर्नरवर गोल करून क्रीडा प्रबोधिनीने प्रतिस्पर्धी संघाची आघाडी ३-२ अशी कमी केली. बाबू मेटाकरने (५२ मिनिटांनी) वैयक्तिक दुसरा गोल करून



इन्कम टॅक्स संघाला ४-२ अशा फरकाने जिंकून दिले.

तिसऱ्या क्रमांकाच्या सामन्यात रिपब्लिकन एस. सी.ने मध्यंतरापर्यंत २-० अशी आघाडी घेत पुणे शहर पोलिसांवर ४-१ अशी मात केली. कृष्णा मुसळेने (७ व्या मिनिटाला) फिल्ड-गोल करीत पुणे शहर पोलिस संघाचे खाते उघडले. रिपब्लिकन एस. सी.ने २१ मिनिटांनी बरोबरी साधली. त्यात सौरभ मैकरचा (२८ व्या मिनिटाला) पेनल्टी कॉर्नरवर गोल महत्त्वाचा ठरला. त्यानंतर देवव्रत हिरेने (२९ व्या मिनिटाला) गोल करून रिपब्लिकन एस. सी.ला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. त्यांनी पहिल्या हाफमध्ये २-१ अशी आघाडी राखली. उत्तरार्धात रिपब्लिकन एस. सी.ने दोनदा गोल करीत मोठी आघाडी घेतली. रायथेम मामनिया (५३ व्या मिनिटाला) आणि श्रीकृष्ण चौरसियाने (५६ व्या मिनिटाला) अनुक्रमे मैदानी आणि पेनल्टी कॉर्नरवर गोल केला तसेच रिपब्लिकन एस. सी. संघाला ४-१ असे जिंकून दिले.

# निवडणुकीच्या विजय जल्लोषादरम्यान मोठी आग; दोन नवनिर्वाचित नगरसेवक भाजले, अनेक लोक जखमी

**जेजुरी । प्रतिनिधी**

नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत विजयानंतर जेजुरीत जल्लोषादरम्यान एक दुर्घटना घडली आहे. यावेळी भंडारा उधळताना आगीचा भडका उडाला आहे. या घटनेत विजयी दोन उमेदवार भाजल्याची माहिती आहे. स्वरूपा खोमणे आणि घाडगे अशी या नगरसेविकांची नावं आहेत. या घटनेचा व्हिडीओदेखील आता समोर आला आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, जेजुरीत निकाल जाहीर झाल्यानंतर नगरसेवक आणि कार्यकर्ते गडाच्या पहिल्या पायरीजवळ भंडारा अर्पण करण्यासाठी गेलो होते. त्यावेळी भंडाऱ्याचा भडका होऊन आग लागल्याची घटना घडली. या आगीच्या घटनेत दोन नवनिर्वाचित नगरसेवक भाजले असून १६ जण झाले आहेत. जखमींना जवळलच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या भाजलेल्या व्यक्तींमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेविका मोनिका राहुल घाडगे आणि त्यांचे पती राहुल घाडगे, राष्ट्रवादीच्या नवनिर्वाचित नगरसेविका स्वरूपा खोमणे आदींचा समावेश आहे. ही घटना आज दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास घडल्याची माहिती आहे. या घटनेबाबत बोलताना पोलिसांनी सांगितलं की ''मल्हार नाट्यगृह येथे मतमोजणी आणि निकाल जाहीर झाला. त्यानंतर राष्ट्रवादीचे विजयी उमेदवार आणि कार्यकर्ते खंडोबा गडाच्या पहिल्या पायरीजवळ भंडारा अर्पण करण्यासाठी गेले होते. या ठिकाणी कार्यकर्त्यांनी उधळण केलेल्या भंडाऱ्याने अचानक पेट घेतला आणि स्फोटही झाला. यामध्ये सुमारे १६जण भाजले असून यात महिलांचा समावेश आहे.

# पिंगोरीत शेतात काम करताना बिबट्याचा हल्ला; ज्येष्ठ शेतकऱ्याने धैर्याने जीव वाचवला

**वाल्हे । प्रतिनिधी**

सैनिकांचे गाव म्हणून ओळख असलेल्या पिंगोरी (ता. पुरंदर) येथील शिंदेनगर परिसरात शेतात काम करत असताना एका ज्येष्ठ नागरिकावर अचानक बिबट्याने हल्ला केला. अचानक समोर आलेल्या बिबट्याने डरकाळी फोडली, मात्र शिंदे यांनी धैर्य न गमावता हातातील काठीच्या साहाय्याने प्रतिकार केला. त्यांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. पायाला दुखापत झाली असतानाही बिबट्याचा प्रतिकार करून स्वतःचे रक्षण केलेल्याने मोठा अनर्थ टळला. श्रीरंग शिंदे हे नेहमीप्रमाणे शनिवारी (ता. २०) सकाळी नऊच्या सुमारास जनावरे बांधण्यासाठी शेतामध्ये गेले होते.

जनावरे बांधत असताना अचानक अवघ्या दहा फूट



अंतरावरून बिबट्याने डरकाळी फोडत त्यांच्या दिशेने उडी मारली. बिबट्या अंगावर आल्याने घाबरलेले शिंदे शेतात खाली पडले आणि त्यांच्या पायाला दुखापत झाली. काळ आला होता, मात्र प्रसंगावधान राखत आणि धैर्य न सोडता शिंदे यांनी हातातील काठीचा उपयोग करून बिबट्याचा प्रतिकार केला आणि स्वतःचे रक्षण केले.

या थोडक्यात केलेल्या प्रयत्नामुळे मोठा अनर्थ टळला धैर्य आणि प्रसंगावधान दाखवत शिंदे यांनी हातातील काठीचा उपयोग करून बिबट्याचा प्रतिकार करत आरडाओरडा केल्याने बिबट्या घाबरून शेजारील ज्वारीच्या शेतातून पसार झाला. घटनेनंतर स्वतःला सावरत शिंदे यांनी या घटनेची माहिती माजी सरपंच जीवन शिंदे यांना दिली. जीवन शिंदे यांनी तत्काळ वनविभागाला याबाबत कळवून परिसरात बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी केली. दरम्यान, वनविभागाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी करावी बिबट्याचा शोध घेऊन पिंजरा लावावा तसेच शेतकरी व ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी तातडीची उपाययोजना करावी, अशी मागणी सरपंच संदीप यादव यांनी केली आहे. या घटनेमुळे शेतात कामासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांनी व नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# बुलडोझरसमोर पहिला मी उभा राहीन! लोकमान्य नगरच्या रहिवाशांना आदित्य ठाकरेंचे शब्द



**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात बिल्डर आणि ठेकेदारांचे सरकार काम करत असून सगळीकडे भाजपचे नेते भूखंड गिळण्याचे काम करत आहेत. असाच प्रकार पुण्यात सुरू असून भविष्यात नवी पेठेतील लोकमान्य नगरमधील म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासाच्या प्रकल्पावर बुलडोझर चालविण्याचा प्रयत्न झाल्यास बुलडोझरसमोर सर्वप्रथम आपण स्वतः उभे राहू अशा शब्दात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी या वसाहतीमधील नागरिकांना दिलासा दिला.

याप्रकरणी दिलेल्या स्थगितीवरून त्यांनी भाजपवर जोरदार निशाना यांनी साधला. आपला पक्ष शेवटपर्यंत रहिवाशांसोबत राहिल, असे आश्वासन दिले. यावेळी लोकमान्य नगर कृती समितीचे ड. गणेश सातपूते शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख सचिन आहिर, शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, माजी गटनेते अशोक हारणावळ यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# आळंदी नगरपरिषदेवर भाजपची एकहाती सत्ता; नगराध्यक्षपदी प्रशांत कुऱ्हाडे विजयी

***आळंदी । प्रतिनिधी***

तीर्थक्षेत्र आळंदी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा निकाल आज जाहीर झाला असून, भारतीय जनता पक्षाने (भाजप) शहरावर आपले निर्विवाद राजकीय वर्चस्व सिद्ध केले आहे. इंद्रायणीकाठी पुन्हा एकदा ‘कमळ’ फुलले असून, विरोधकांचे सर्व मनसुबे धुळीस मिळवत भाजपने एकहाती सत्ता काबीज केली आहे. भाजपचे प्रशांत कुऱ्हाडे यांनी प्रतिस्पर्धी उमेदवारांचा मोठ्या मताधिक्याने पराभव करत नगराध्यक्षपदावर कब्जा मिळवला. २१ डिसेंबर रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अधिकृत निकाल घोषित केला आहे.

नगरसेवक पदाच्या एकूण जागांपैकी बहुतांश जागांवर भाजपच्या उमेदवारांनी मोठ्या फरकाने विजय मिळवला आहे. गेल्या काही महिन्यांपासून



आळंदीच्या विकासावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप सुरू होते. मात्र, आळंदीकरांनी विकासाच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा भाजपच्या झोळीत मतांचे दान टाकले आहे. भाजपची लाट असतानाही शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने काही प्रभागांत आपले अस्तित्व राखण्यात यश मिळवले आहे. काही महत्त्वाच्या प्रभागांमध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी भाजपला कडवी झुंज दिली, मात्र बहुमताचा आकडा गाठण्यात त्यांना अपयश आले. काँग्रेसला या निवडणुकीत मोठी गळती लागल्याचे चित्र निकालानंतर स्पष्ट झाले आहे. आळंदी नगरपरिषदेची मतमोजणी प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी जयराज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत शांततेत आणि पारदर्शक वातावरणात पार पडली. प्रशासनाने केलेल्या चोख नियोजनामुळे निकालाची प्रक्रिया सुरळीत पार पडली. निकाल जाहीर होताच आळंदी शहरात भाजप कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. ‘राम कृष्ण हरी’च्या जयघोषात गुलालाची उधळण आणि फटाक्यांची आतिषबाजी करत हा विजय साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे, भाजपच्या अनेक दिग्गज नगरसेवकांनी आपले गड राखण्यात यश मिळवले असून, आळंदीच्या मतदारांनी काही नवीन आणि तरुण चेहऱ्यांनाही यावेळेस नगरपरिषदेत काम करण्याची संधी दिली आहे. आळंदी हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो आणि २०२५ च्या निकालाने त्यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. ही निवडणूक आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी भाजपसाठी बूस्टर डोस ठरणार आहे, तर शिवसेना आणि राष्ट्रवादीला आळंदीत पुन्हा उभारी घेण्यासाठी नवीन रणनीती आखावी लागणार आहे.




# सुनिधी चौहान यांना ‘सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार’ जाहीर; संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल गौरव

**पुणे । प्रतिनिधी**

जागतिक कीर्तीच्या पार्श्वगायिका सुनिधी चौहान यांना सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने ‘सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार ‘ प्रदान करण्यात आला. ‘सूर्यदत्त’चे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया यांच्या हस्ते सुनिधी चौहान यांना गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह, मानपत्र, सूर्यदत्तचा स्कार्फ असे पुरस्काराचे स्वरूप होते.संगीत, गायन क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

प्रसंगी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा आदी उपस्थित होते. डॉ. संजय चोरडिया म्हणाले, जागतिक कीर्तीच्या कलाकार असलेल्या सुनिधी चौहान यांना पुरस्कार प्रदान केल्याने पुरस्काराची उंची वाढली आहे. मुलांना प्रेरणा मिळावी, त्यांना आदर्श व्यक्तिमत्त्वांना ऐकता यावे, यासाठी ‘सूर्यदत्त’ नेहमीच नामवंत व्यक्तींना संस्थेमध्ये बोलावत असते, असेही त्यांनी नमूद केले. गेल्या दोन दशकांपासून सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनने विविध क्षेत्रांतील जागतिक स्तरावर कार्यरत अनेक मान्यवरांना ‘सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार’ देऊन गौरवले आहे. राष्ट्राच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या आणि नवे मानदंड निर्माण करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करून विद्यार्थ्यांसमोर आदर्श ठेवण्याचा, तसेच सामाजिक उत्तरदायित्व जपण्याचा प्रयत्न सूर्यदत्त नेहमीच करीत असल्याचे डॉ. चोरडिया म्हणाले.